IRBK-0100446

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र ४४६

लेखक

## आनंदराव कृष्णाजी टेकाडे.

IRBK-0100446
IRBK-0100446

भट आणि मंडळी, पुणें.

# मथुरा

[ एक पौराणिक नाटक ]

लेखक

आनंदराव कृष्णाजी टेकाडे,

नागपूर.

१९२२

IRBK-0100446

प्रकाशक—भट आणि मंडळी, पुणें.

किंमत एक रुपया.

हें पुस्तक रा. **अच्युत चिंतामण भट** यांनीं आपल्या पुणें येथील
यशवंत छापखान्यांत छापून तेथेंच प्रसिद्ध केलें.

या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपल्याकडे ठेविले आहेत.

भारतवर्षाचा मोहरा—मध्यदेशचा नेता

आणि

फणीन्द्रपुरचा मार्गदर्शक

**डॉक्टर**

**बाळकृष्ण शिवराम मुंजे**

यांस

त्यांचा अतुल स्वार्थत्याग, अलौकिक धैर्य

विलक्षण चिकाटी, थोर मुत्सद्देगिरी

आणि निरुपम देशभक्ति

या गुणांवर लुब्ध होऊन

**हें कृतिसुमन**

अर्पण केलें आहे.

# प्रस्तावना.

हजारों वर्षें झालीं तरी ज्याच्या चारित्र्यगंगेचा अपार अंत लागला नाहीं, त्या अनंताचें–श्रीकृष्णाचें यशोवैभव माझ्यासारखा पामर कितीसें गाणार! परंतु प्रत्येक जण आपापल्या शक्त्यनुसार त्या पावन गंगेंत बुडी मारीत असल्याचें मात्र प्रत्यहीं आपण पहात असतों. तदनुरूप श्रीकृष्णचरित्राचे नानाविध तंतु मनोभूमिकेवर खेळत असतां कंसवधाच्या कथेचे जे तंतु विणले गेले त्यांचा हा शब्दचित्रपट नाट्यरूपानें यथामति तयार केला आहे. त्या चित्रपटावरून नजर जात असतां क्वचित् मधूनमधून संगीताचाही नाद वाचकांना ऐकूं यावा अशी तजवीज केली आहे.

याही नाटकाचे वेळीं माझ्या कांहीं साहित्यभक्त मित्रांचें मला अप्रतिम साह्य झालें आहे. त्यांतल्या त्यांत रा. रा. नारायण रंगनाथ अळेकर, जयकृष्ण केशव उपाध्ये ऊर्फ रामानुज, लक्ष्मण गणेश तेलंग आणि गुणवंत हणुमंत देशपांडे यांचा नामनिर्देश प्रामुख्यानें करणें अवश्य आहे. रा. वामन गोपाळ जोशी ( राक्षसी महत्वाकांक्षेचे कर्ते ) यांनीं आपलें एक पद्य घेण्याची मला मोठ्या आनंदानें परवानगी दिली. रा. रामकृष्ण विनायक काळी यांनीं हस्तलिखित नाटकाची सुवाच्य प्रत परिश्रमानें तयार करून दिली. व श्रीमंत नानासाहेब कावरे यांनीं कांहीं पदांच्या मनोहर चाली दिल्या. तसेंच प्रकाशनाची सर्व तऱ्हेची जबाबदारी रा. अच्युत चिंतामण भट यांनींच आपल्या नेहमींच्या उत्साहानें पत्करली त्याबद्दल या सर्वांचा मी अतिशय आभारी आहें.

आजचें हें मथुरा नाटक माझें दुसरें होय. आणि तें मधुरमीलनानंतर अल्पावधींतच प्रसिद्ध होत आहे. याहि नाटकाचा महाराष्ट्रवाचकांकडून सत्कार होवो अशी त्या परमेश्वराची प्रार्थना करून ही अल्प प्रस्तावना आटोपतों.

गडकरी यांचा वाडा,<br>
महाल–नागपूर.<br>
ता. १ सप्टेंबर १९२२.

आनंदराव कृष्णाजी टेकाडे.

## नाटकांतील पात्रें.

| | | |
|---|---|---|
| श्रीकृष्ण | | |
| कंस | ... | मथुराधिपति. |
| अक्रूर | ... | कंसाचा प्रजाजन, मथुरेचा कैवारी. |
| राधा | | |
| मथुरा | ... | कंसाच्या पारतंत्र्यांत असलेली. |
| मायावती | ... | कंसाची पत्नी. |
| जयंती, चपला | ... ... | मायावतीच्या दासी. |

शिवाय गवळी, गवळिणी, गोपाळ, राजसेवक, इतर शिपाई, मथुरेचे नागरिक, मथुरेंतील स्त्रिया, कंसाचा प्रधान, वगैरे वगैरे.

श्री

# मथुरा

[ एक पौराणिक नाटक. ]

## अंक पहिला.

### प्रवेश १ ला.

( यमुनेच्या वाळवंटांत कांहीं मुलेंमुलीं श्रीकृष्णाच्या प्रतिमेची
पूजाअर्चा करून प्रार्थना करीत आहेत
असा पडदा उघडतो. )

[ हमीर–त्रिवट ]

**माधव हा मुखिं गावा ॥**

**गोकुलजनमन रमवि चिरंतन । विकसवि जो शुचि भावा ॥ ध्रु०**
**भंवतीं सुरभी पय पाजाया । गोपी वदन पुसाया**
**मुरलिताल गोपाल धराया । सुखकर तो जगिं व्हावा ॥ १ ॥**
**दास्यनिकंदनिं खलनिर्मूलनिं । यदवतरण या लोकीं**
**जनतामय त्या ईशा वंदुनि । प्रेमभरें मनिं घ्यावा ॥ २ ॥**

[ नंतर मुलें टिपऱ्या, गोफ वगैरे खेळ खेळतात. ]

**एक मुलगा**—दीन अनाथांचें पालन करणाऱ्या श्रीकृष्णाचा जयजयकार असो !

**दुसरी मुलगी**—सज्जनांचें रक्षण करणाऱ्या श्रीकृष्णाचा जयजयकार असो.

**तिसरा मुलगा**—दुष्टांचा संहार करणाऱ्या श्रीकृष्णाचा जयजयकार असो !

**पडद्यांत**—कंसराजाच्या या मथुरानगरींत त्या घातकी कृष्णाच्या नांवाचा जयजयकार करून मरणाला कोण जवळ बोलवीत आहे ?

( कांहीं राजसेवक प्रवेश करितात. )

**एक राजसेवक**—कंसराजाच्या या मथुरानगरींत कंसाच्या शत्रूचा—त्या

घातकी कृष्णाचा जयजयकार करून राजाचा उपमर्द करणारे तुह्मीच काय ?

**मुलें**—होय, आह्मीच.

**राजसेवक**—( मुलांची पूजा वगैरे सर्व लाथाडून देऊन ) हा तुमच्या 'होय–'चा परिणाम काय होतो हें पहा!

**एक मुलगी**—वीतभर पोटाची खळगी भरण्यासाठीं प्रत्यक्ष श्रीकृष्ण परमात्म्याची अशी विटंबना करतोस, यापेक्षां या यमुनेंत जीव कां देत नाहींस ?

**राजसेवक**–परमात्मा कोण ? हा विश्वासघातकी पळपुट्या चोरटा कृष्ण तुमचा परमात्मा अं! ( श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे तुकडे तुकडे करून यमुनेंत फेंकून देऊन ) हें घ्या तुमच्या परमात्म्याला यमुनेंत जलसमाधि देऊन क्षीरसागराला पाठवून देतों!

**एक मुलगी**—नरकांत जाशील!

**राजसेवक**—आपल्या राजाची भक्ति न करितां त्याच्या शत्रूची भक्ति करणारेच नरकांत जातात. कंसराजाच्या प्रत्यक्ष राजधानींत त्याच्या शत्रूचा जयजयकार ह्मणजे राजाविरुद्ध उघड उघड बंड होय. या बंडाचा परिणाम तुमच्या त्या पाजी कृष्णाच्या प्रतिमेच्या झालेल्या तुकड्यांवरून तुमच्या ध्यानांत आलाच असेल. आतां ताळ्यावर येऊन पुन्हां असला बेताल मूर्खपणा करणार नाहीं अशी कबूली देत असलां, तर आतांचा हा तुमचा गुन्हा या वेळेपुरता तुम्हांला माफ केला जाईल.

**एक मुलगा**—पण आम्हांला प्रिय असणाऱ्या श्रीकृष्णाची अवहेलना करणाऱ्या एखाद्या नादान मनुष्याकडून असल्या बेगडी औदार्याची आम्ही अपेक्षा करीत नाहीं!

**दुसरा मुलगा**—आणि वसुदेवासारख्या सज्जनांना विनाअपराध बंदिवासांत ठेवून लहान लहान मुलांचा निर्दयपणानें खून करणाऱ्या आणि मथुरेसारख्या आमच्या मातृदेवतेला अमानुषपणें छळणाऱ्या राजाची पूजा कोणतीही प्रजा आनंदानें करणार नाहीं.

**राजसेवक**—( आपल्या सोबत्यांस ) या सर्वांच्या डोक्यांवर हें सगळं सामान देऊन ह्यांना अस्सेच्या अस्से कंसराजापुढें घेऊन चला!—त्या नादान वसुदेवानें मथुरेंतील या तरुणांचीं डोकीं कशीं बिघडवून टाकलीं आहेत!

**मुलगा**—( जातां जातां ) हे श्रीकृष्णा ! प्रजेला आवडणाऱ्या पूज्य देवतेच्या भक्तिपूर्वक केलेल्या पूजेचा असा विध्वंस ज्या राज्यांत आणि ज्या राजाच्या हुकमामुळें होतो तें राज्य आणि तो राजा आणखी किती दिवस या जगांत नांदणार ! ( जातात. )

---

## प्रवेश दुसरा.

[ **राधा** प्रवेश करिते. ]

**राधा**— ( मांड-केहरवा )

**मन्मानसहंसा कन्हैया । जाशि कुठें या समया ॥ ध्रु० ॥**
**प्रेमजलींचें हृदयकमल हें । लागे म्लान कि रे व्हाया ॥ १ ॥**
**तुझ्या दर्शनाविना सकलही । असती जीवभोग वाया ॥ २ ॥**

इथेंही श्रीकृष्ण दिसत नाहीं ! हा गेला तरी कुठें ? केव्हांपासून तरी याला मी शोधतें आहें ! आज हा कुण्या उद्योगांत एवढा गुंतला आहे कुणाला ठाऊक ? असें ठिकाण राहिलें नाहीं कीं जिथें मी गेलें नाहीं ! मला—या राधेला माहित नाहीं असें कोणचें ठिकाण श्रीकृष्णानें आज पाहिलें आहे ! आणि ती गोष्ट अजून मला कशी कळली नाहीं ? श्रीकृष्णानें या राधेपासून आजपर्यंत कोणतीही गोष्ट चोरून ठेविली नाहीं. मला तरी एकही आठवत नाहीं ! श्रीकृष्णाकडून ज्या ज्या अद्भुत गोष्टी आजपर्यंत घडल्या त्या सर्व माझ्या अनुमतीनें. मला विचारल्यावांचून किंवा माझी अनुमति मिळाल्याशिवाय त्यानें एकही गोष्ट केली नाहीं मोठमोठ्या असुरांचा श्रीकृष्णानें वध केला तो या राधेच्या संमतीनें.—वाऱ्याला सुद्धां पोहोंचायला वेळ लागत असेल, पण कृष्णाची गोष्ट मला कळायला क्षणही लागत नाहीं. आजचें त्याचें हितगुज मला न कळण्यासारखें असेल काय ?—एखाद्या वांखराप्रमाणें त्याच्याकरितां मी वणवण हिंडून राहिलें आहें ! मग तो मला कां भेटूं नये ? कां मुद्दामच माझी मौज करण्यासाठीं अनोळख्या जागीं तो लपून बसला असेल ? छे, तें शक्य नाहीं. राधा बरोबर असल्याशिवाय कृष्ण कोणच्याही नवीन स्थलीं जाऊं शकत नाहीं.—मी हें काढलेलें कृष्णाचें चित्र त्याला केव्हां दाखवूं ? चित्राचे रंग वाळल्यावर ? नाहीं; चित्राचे रंग वाळण्याचे आधींच ही तजबीर कृष्णाला दिसली पाहिजे ! रंग वाळल्यावर रंगांचा रंगपणा राहणार

नाहीं. श्रीकृष्णाची मूर्ति या राधेच्या अंतःकरणाच्या आरशांत किती हुबेहुब ठसली आहे हें या चित्रामें दाखवून त्याला मी एकदम चकित करून सोडणार होतें. पण माझी ही चित्राची गोष्ट त्याला समजली तर नाहीं ? पण कळणार कशी ? कुणालाही न समजूं देतां मीं हें चित्र काढलें आहे.—पण श्रीकृष्ण भेटणार केव्हां ! त्याला भेटण्याकारितां मन कसें अधीर झालें आहे ! या अधीरपणामुळें त्याला भेटण्याचेंसुद्धां मी विसरून जाईन ! तो याच माझ्या आनंदाच्या वृत्तींत मला भेटला पाहिजे.—श्रीकृष्ण कुठ भेटेल ?—हीं कुणाचीं पावलें ! खास कृष्णाचींच ! श्रीकृष्ण यमुनेला तर गेला नाहीं ? पण आतांच तर मी तिथून आलें ! कदाचित चांगलें पहायला विसरलें असेन ! एकपरी मनाच्या उत्सुकतेंत दुर्लक्ष होणें साहजिक आहे.—पुन्हां जाईन. राधाकृष्णाची भेट आजच्या सूर्यानें आपल्या डोळयांनीं पाहिलीच पाहिजे.

( सुरवातीस म्हटलेलें पद म्हणत जाते. )

( राजसेवक आणि मुलें प्रवेश करितात. )

**राजसेवक**—अजूनही विचार करण्यास तुम्हांला वेळ आहे. विचार करा. उच्छृंखलपणानें पोरबुद्धीच्या भरीस पडूं नका. कोणालाही शाहणा समजून त्याच्या वरपांगी बोलण्यावर विश्वास ठेवणें हिताचें होत नाहीं. कंसराजासमोर गेल्यावर याचा काय परिणाम होईल हें माहित आहे ना ?

**मुलें**—होय, माहित आहे. इतकेंच नव्हे तर कोणचीही शिक्षा भोगायला आमची पूर्ण तयारी आहे.

**राजसेवक**—पण एका क्षुल्लकशा गोष्टीनें जर हा प्रसंग निभावतो आहे, तर मग असला मूर्खपणा कां करितां ? त्या कृष्णाची आजपासून भक्ति न करितां कंसराजाचीच कीर्ति गाऊं, असें फक्त आम्हांला तुम्ही लिहून द्या. अरे वेड्यांनो, ऐन संकटाच्या वेळीं तो खुळा अक्रूर, तो दिवटा वसुदेव—

**मुलें**—हां, तोंड आटपा ! त्या सत्वशील महात्म्याविषयीं असले अभद्र शब्द ऐकण्याची आमची इच्छा नाहीं.—या वयांतच आम्ही असे कच्च्या दिलाचे राहूं तर आमच्या पुढील आयुष्याचा काळ तुमच्या कंसराजाच्या राज्यांत स्वाभिमानपणें जाणें मोठेंच मुष्किलीचें होणार आहे. त्यापेक्षां—

**राजसेवक**—सुळावरच गेलेलें काय वाईट ? ( मुलांना ओढीत नेतात. )

## प्रवेश २ रा.

( मथुरेची मानगुटी धरून **कंस** प्रवेश करितो. )

**कंस**—पाजी मथुरे, तूं माझ्याशीं आतां अशी हरामखोरी करायला लागलीस काय ? साधें प्यायला पाणी मागितलें तर त्यांतसुद्धां तूं हें विष टाकलेंस ! पहा—नीट डोळे फाडून पहा, ह्या पेल्यांत किती जलाल कालकूट भरलें आहे तें - कोणीं सांगितली तुला ही बदमाषगिरी ? बोल, बोल, अगदीं खरें बोल. नाही ! तर फुलासारखी ही तुझी मुंडी या धडापासून वेगळी करितों पहा ! पहा-पुन्हां आणखी पहा ह्या पेल्यांत काय दिसतें तें !

**मथुरा**—नाहीं महाराज, देवाची शपथ मी त्यांत कांहींसुद्धां मिसळलें नाहीं. तें शुद्ध पाणी आहे.

**कंस**—शुद्ध पाणी आहे ?—काय हा कंस आंधळा आहे हें शुद्ध म्हणायला ? कीं तूं आंधळी आहेस ? भामटे, पुन्हां पहा ह्या पेल्यांत काय दिसतें तें—पाणी शुद्ध आहे ?

**मथुरा**—होय महाराज. दुर्जयानें आतांच यमुनेचा घट भरून आणला आहे. आणि त्यांतलेंच स्वच्छ भांड्यांत चांगलें गाळून महाराजांस मी प्यायला पाणी आणून दिलें. महाराजांच्याच पायाची शपथ, मी हें खोटें सांगत नाहीं.

**कंस**—हरामजादे, ( पुन्हां मानगुटी धरून ) खोटें सांगत नाहीस ? पुन्हां यांत काय आहे तें पहा !

**मथुरा**—नुसतें पाणी आहे महाराज !

**कंस**—पुन्हांही पाणीच आहे ? तूं आंधळी कीं मी आंधळा—कीं दोघेही आंधळेच ?

**मथुरा**—नाहीं महाराज, ह्या पेल्यांत स्वच्छ पाण्याशिवाय दुसरें कांहींही नाहीं.—आपण पाहतांना त्यांत आपलें रूप दिसत असावें !

**कंस**—माझें रूप इतकें काळेंकुट्ट आहे ? हलकट मथुरे, तुला आजपर्यंत मी मोठ्या सरळ स्वभावाची समजत होतों. पण शेवटीं तूं आपल्या जातीवर गेलीस. बटकीचे पोरी, अशानें हा कंस तुला तुझ्या दास्यांतून मुक्त करील असें कां तुला वाटलें ? मुक्त होण्याचा मार्ग हा नव्हे. माझ्या राज्यांत, माझ्या राजधानींत, माझ्या राजवाड्यांत, माझ्या रंगमहालांत, खुद्द माझ्यासमोर—माझ्याशींच प्रतारणा करणाऱ्याला हा कंस असा लाथेखालीं तुडवीत असतो !

( कंस जोरानें लाथ मारतो. मथुरा खालीं पडते.)

( मायावती प्रवेश करिते. )

**मायावती**—कां असा तिचा अपमान करावा? मथुरा थोर कुलांतली आहे! दुर्दैवानें ती तुमच्या हातांत सांपडली म्हणून वाटेल तसें तिला लाथाडणें आपणांसारख्या राजेलोकांस शोभत नाहीं.

**कंस**—प्राणावर उठणाऱ्यालाही क्षमाच करावी असें का तुझें म्हणणें आहे?

**मायावती**—काय, मथुरा आपल्या प्राणावर उठली? छे, ही गोष्ट अशक्य कोटींतली आहे. मथुरेइतकी चांगल्या मनाची स्त्री माझ्या पाहण्यांत दुसरी नाहीं. आपण जो तिचा पदोपदीं मानभंग करीत असतां त्याविषयीं बिचारीच्या तोंडून एक व्रही निघालेला मीं कधीं ऐकलेला नाहीं. पण कोणच्याही गोष्टीचा अंत पाहणें चांगलें नव्हे.

**कंस**—त्याचाच सूड घेण्याचा हिनें विचार केला नसेल कशावरून? असे न बोलणारे घुमेच मोठे फंदी असतात.

**मायावती**—तरी पण सज्जन माणसाकडून असला घातकी नीचपणा घडणें केव्हांही शक्य नाहीं. आपण बिचारीवर व्यर्थ रागावलांत.

**कंस**—मग मीच खोटा? तुझ्या लाडक्या आणि सज्जन मथुरेनें या तुझ्या नवऱ्याला विषाचें पाणी प्यायला आणून दिलें!

**मायावती**-काय, ह्या पाण्यांत विष आहे? नावडतीचें मीठ अळणी, तशां-तलीच ही गोष्ट म्हणायची!

**कंस**—मायावती, ही सगळी केवळ तुला थट्टाच वाटते होय? पहा—ह्या पेल्यांत तूं नीट डोळे उघडून पहा—आणि तुझ्या या कंसला ठार मारणारा शत्रु—तो काळतोंड्या या पाण्यांत लपून बसला आहे कीं नाहीं, तें सांग.

**मायावती**—याच्यांत श्रीकृष्ण लाला आहे? पहा बरें नीटपणें. ( पेल्यांतील पाणी ओतून दाखविते. ) गेला ना भ्रम?—झालीना खात्री?

**कंस**—( भांबावतो ) मायावती, कांहीं वेळ येथें मला एकट्यालाच असूं दे. या मथुरेची नीट काळजी घे. आजचें किल्मिष इच्या मनांतून काढून टाक. आज तिला मीं निष्कारण त्रास दिला आहे. पण-पण नाहीं सांगत तुला भी तें.

( मायावती जाते. )

( दूत प्रवेश करितो. )

**दूत**—मथुराधिपतीचा जयजयकार असो ! महाराज, आपल्या वृषभासुरास श्रीकृष्णानें ठार मारलें !

( दुसरा दूत प्रवेश करितो. )

**दुसरा दूत**—मथुराधिपतीचा विजय असो ! महाराज, धेनुकासुराचा बलरामानें वध करून ताल-वन गाईगोपांना चरण्याफिरण्यास खुलें करून दिलें !

( तिसरा दूत प्रवेश करितो. )

**तिसरा दूत**—मथुराधिपतीचा जयजयकार असो ! महाराज, कालिया सर्पाला श्रीकृष्णानें हांकलून देऊन यमुनेंतला विषारीपणा पार काढून टाकला !

( चौथा दूत प्रवेश करितो. )

**चौथा दूत**—मथुराधिपतीचा विजय असो ! महाराज, प्रलंबासुराचा बलरामानें नुसत्या मुष्टिप्रहारानें प्राण घेतला. आणि श्रीकृष्ण आपल्या गोपाळांसह आपल्या प्रिय मित्र अघासुराच्या पोटांत शिरून तो सर्वांसह त्याचें पोट फोडून बाहेर निघाला !

( राजसेवक मुलांसह प्रवेश करितात. )

**राजसेवक**—राजाधिराज कंसराजांचा जयजयकार असो ! महाराज, कंसराजाच्या राजधानींत—मथुरेची फूस मिळून—यमुनेच्या वाळवंटांत या वात्रट पोरापोरींनीं कंसराजाचा निःपात करण्याविषयीं परमेश्वराची प्रार्थना करून कंसराजाच्या शत्रूचा—त्या कृष्णाचा मोठमोठ्यांनीं जयजयकार केला !

**मुलगा**—कंसा, तूं आमचा राजा आहेस. आणि राजा हा प्रजेचा आईबाप-प्रजेच्या सुखदुःखांचा वांटेकरी असतो. प्रजेच्या आनंदांतूनच राजाचें समाधान उगम पावत असतें. आणि त्या समाधानानेंच राजा स्वतःला धन्य समजतो. खरोखर पाहूं गेलें असतां कंसराजाशिवाय दुनियेंत कोणीही आह्मांला आवडता असूं नये. आमच्या तरुण अंतःकरणांला तर तुझ्या यशोगानाशिवाय दुसरें कांहींही सुचूं नये. परंतु कंसा, तुझ्यासमोर तुझा धिक्कार करून तुला वाटणाऱ्या तुझ्या हाडवैऱ्याचे-त्या श्रीकृष्णाचे-आह्मी तरुण आज धन्यवाद गातों. राजाचा वैरी तोच आह्मां प्रजाजनांचाही वैरी. मग तो कितीही बलवान असो. परंतु कंसा, तुझ्या पराजयानें उलट आमच्या मनाला आनंदच होतो !

तेव्हां या उलटया प्रकाराचा तूं कधीं शोध केला आहेस काय?

**मुलगी**—कंसराजा, पूर्वपुण्याईनें या मथुरेचा आणि तिचेच अंशभाग असलेल्या आमचाही तूं अधिपति झाला आहेस. आमचें तरुण रक्त कितीही सळसळत असलें तरी तुझ्याच छत्राचा आम्हांला अभिमान वाटूं दे. विनाकारण आम्हां दोघांचाही असा छळ करूं नकोस. मथुरेला आणि आम्हांला दोघांनाही स्वातंत्र्याच्या आनंदांत स्वच्छन्द खेळूं दे. मग पाहूं दे कंसराजाच्या स्तुतीशिवाय कोणत्या श्रीकृष्णाची भूपाळी पहांटेच्या प्रहरीं गायिली जाते?

**मुलगा**—राजा, आम्हां तरुण मुलांच्या स्पष्ट बोलण्याचा राग मानूं नकोस. आमच्या तरुण वृत्तीला आंत एक आणि बाहेर दुसरें, असा लपंडाव माहीत नाहीं. मनाला वाटतें तें बोलून दाखवावयाचें. कंसा, राजा तोच कीं, ज्याच्या शुभ्र कीर्तीचा ध्वज तरुण प्रजेच्या राजभक्तींत भिजून आकाशांत उंच उंच अखंड फडकत असतो. तरुण प्रजेचा अंतःकरणांत राजाच्या नाशाची बुद्धि निपजणें हें दोघांनाही भूषण नाहीं. दोघांनाही ही गोष्ट लाजिरवाणी आहे. आम्हांला कळून चुकलें आहे कीं, तुझ्या दृष्टीनें वाटणाऱ्या आमच्या अपराधाबद्दल तूं आम्हांला मोठी भयंकर शिक्षा करणार आहेस म्हणून. पण तूं स्वभावानें जितका जितका जास्त क्रूरपणा करशील, तितकें तितकें तुझें मन जास्त दुबळें आणि भित्रें होत जाईल. दुबळया आणि भित्र्या मनावांचून कोणाचाही निष्कारण छळ जगांत होतच नाहीं. परंतु कंसा, शेवटीं तुला इतकीच आमची प्रार्थना आहे कीं, तूं आपल्या बेगुमानपणानें आमच्या तरुण आणि उच्छृंखल वृत्तींकडून राजनाशाचें भयंकर पातक घडविण्यापेक्षां आमच्या शिरानें आणि रक्तानें कंसराजाची त्रिखंडकीर्ति दुमदुमविण्याचा पुण्यलाभ आम्हां तरुणांच्या पदरांत पडूं दे.

**कंस** (एकदम उसळून)—गप बसा मूर्खांनो! चला रे, यांना न्यायमंत्र्याकडे घेऊन जा. आणि माझें दुसरें आज्ञापत्र येई तोंपर्यंत यांची चौकशी करून यांना अंधारकोठडीची शिक्षा द्यायला सांग. [ जातो. ]

**मुलें**—( कंसाला ऐकूं जाईल एवढया मोठयानें ) कंसा, ज्या श्रीकृष्णभक्तीमुळें तूं आम्हांला आज अंधारकोठडीची निष्ठुर शिक्षा सांगितलीस, तीच श्रीकृष्णभक्ति त्यांतून आमची सुटका केल्याशिवाय राहणार नाहीं ही खात्री ठेव.

[ सर्व जातात. ]

## प्रवेश ४ था.

[ राधा प्रवेश करिते. ]

**राधा**—छ! इथेंही श्रीकृष्ण नाहीं! हें आज यानें मांडलें आहे तरी काय? मी आणखी किती धीर धरूं! ज्याचें नांव उच्चारतांच, किंबहुना नुसतें मनांत आणतांच जो माझ्यापुढें दत्त ह्मणून उभा राहायचा, त्या श्रीकृष्णासाठीं आज दिवसभर मी सारखी टाहो फोडतें आहें, पण त्याचा पत्ता नाहीं. आतां माझा हा अन्त किती पहाणार? श्रीकृष्णा!

( पतिविरहिं बिचारी० या चालीवर )

**हा विरह तुझा रे जाळी हृदय हरी**
**किति अंत असा हा देवा! बघसि तरी**
**वदनचंद्र दावि अतां। दीन ही चकोरी ॥ १ ॥**

श्रीकृष्णाला या राधेचा स्नेह नकोसा झाला काय? व ह्मणून त्यानें माझा त्याग केला काय? पण मी हें कसें बोलूं? श्रीकृष्णाचें राधेकडून आजपर्यंत—या क्षणापर्यंत अनिष्ट असें काय घडलें? माझ्यामुळें त्याची अशी कोणती अपकीर्ति झाली? राधेच्या स्नेहामुळें श्रीकृष्णाला जगांत कुणीं नांवं का ठेवलीं? त्यानें मला एका शब्दानें तर सांगायचें होतें! मला न कळवितांच त्यानें माझा त्याग कां केला? त्याला माहीत आहे कीं, श्रीकृष्णाचा एका पळाचाही विरह ह्मणजे राधेला एका युगाप्रमाणें वाटतो. खऱ्या स्नेह्याजवळ कोणचाही गुप्तपणा उघड होतो. मग माझ्यापासून ही गोष्ट त्यानें लपवून कां ठेवावी? मला वाईट वाटेल ह्मणून? पण जिथें जन्मभर आक्रोश करायचा, त्यांत या क्षणिक वाईट वाटण्याची आणखी कितीशी भर पडली असती? राधेचा त्याग करण्याचा निश्चय एकदां ठरल्यावर, त्याचें तिला दुःख होईल कीं आनंद वाटेल हें संकटच त्याला मुळीं वाटायला नको होतें.—पण खऱ्या स्नेह्याचा त्याग होत नाहीं असें श्रीकृष्णच माझ्याजवळ कितीदां तरी ह्मणाला आहे. पण जिथें खरा स्नेहच नाहीं तिथें कसला आला आहे एवढा विचार! मग मला त्यानें आपला लळा तरी इतका कशाला लाविला?—श्रीकृष्णानें त्याग केल्यावर राधेनें आपलें तोंड जगाला कसें दाखवावें? नव्हे, श्रीकृष्णाविना राधा आतां जिवंतच कशी राहील? ( चित्राकडे पाहून) चित्रा, ज्याच्या साठीं तुला मीं निर्माण केलें त्यानेंच माझा त्याग केल्यावर

तुझें तरी आतां काय प्रयोजन? तुलाही मी या यमुनाजळांत सोडून देतें. ( इतकें म्हणून यमुनेंत तें चित्र टाकायला जाते. इतक्यांत वाहत आलेले कांहीं कागदाचे तुकडे तिच्या नजरेस येतात. त्यापैकीं एक तुकडा हातीं घेऊन ) हा कशाचा तुकडा बरें? चित्राचा. कुणाचें हें चित्र?—चित्र श्रीकृष्णाचें होय. आणि माझें! या दोहोंत कितीतरी जमीनअस्मानचें अंतर! श्रीकृष्ण या राधेजवळून आजवर केव्हांही दूर झाला नाहीं. अष्टौप्रहर माझ्यासंनिध असतां श्रीकृष्णाचें हुबेहुब चित्र राधेला काढतां येऊं नये आणि नुसत्या कल्पनेच्या जोरावर श्रीकृष्णाचें तंतोतंत चित्र दुसऱ्यानें रेखाटावें हें कशाचें दर्शक? 'श्रीकृष्ण माझा' असा या राधेला या घटकेपर्यंत मोठा गर्व वाटत होता, पण श्रीकृष्णाला आपला समजणारे या राधेहूनही थोर जीव जगांत दुसरे पुष्कळ आहेत.

[ उगिच कां कांता० या चालीवर ]

**दुरभिमाना या माधवा वाही वाया ॥ ध्रु० ॥**
**हृदयासी बोले नलिनी**
**मजचि हर्षवी हा तरणी**
**भंवतिं पाहिना परि नयनीं**
**तेंवी मम स्थिति घडिला या ॥ १ ॥**

( मोठयानें ) आतां राधेचा अवतार संपला —

[ श्रीकृष्ण प्रवेश करितो. ]

**श्रीकृष्ण**—नाहीं. कंसवध होऊन मथुरा मुक्त झाल्याशिवाय राधेचा अवतार संपणें शक्य नाहीं.

[ सुरसुखखनि० या चालीवर. ]

**खलरिपुवध होउनियां । शुचिता विहराया ॥ ध्रु० ॥**
**जीवन हें तव सखये । विहित असे लोका या ॥ १ ॥**
**जगताची तूं विजया । नीतिनया वितराया**
**अवतरली अवनितलीं म्हणुनिच या ॥ २ ॥**

**राधा**—श्रीकृष्णा, तुझ्यावर मी फार रागावलें आहें.

**श्रीकृष्ण**—मीही तुझ्यावर रागावलों आहें

**राधा**—कां बरें? तुझें काय कारण?

**श्रीकृष्ण**—जसें तुझें, तसेंच माझें.

**राधा**—आज सगळ्या दिवसभर तूं कुठें होतास ?

**श्रीकृष्ण**—पण तूं देखील कोठें बेपत्ता झाली होतीस ?

**राधा**—तुला शोधण्याकरितां ह्मणून केव्हांपासून तरी मी सारखी भटकत फिरत आहें !

**श्रीकृष्ण**—आणि तुझ्याकरितां माझा पाय जाग्यावर नाहीं !

[ कुठें तारा॰ या चालीवर ]

**कुठें माया । जिवाची या । ह्मणोनीयां । किती पाही**
**कुण्या ठाया । तुझी छाया । दिसेना या । मुळीं कांहीं**
**अखिला जगता । संशयरहिता । कीं जणुं ललिता । जी मोही**
**मजपासुनियां । ती निज माया । कां मग वाया । दुरि ठेवी ॥**

**राधा**—श्रीकृष्णा, खरोखरच तुझ्यावर मी रागावलें आहे बरें ?

**श्रीकृष्ण**—आणि राधे, मीही तुझ्यावर रागावल्याचें खोटें सांगत नाहीं बरें ?

**राधा**—तुझ्याशीं मी बोलणार नाहीं.

**श्रीकृष्ण**—मग जगानें कोणाशीं बोलून समाधान मानून घ्यावें ?

**राधा**—राधा श्रीकृष्णावांचून दुसरें जग जाणत नाहीं.

**श्रीकृष्ण**—मग श्रीकृष्णाच्या चित्राचें कोडकौतुक जग कसें करील ?

**राधा**—चित्र श्रीकृष्णासाठीं आहे, जगाकरितां नाहीं. पण आतां तुला तें मी दाखविणार नाहीं.

**श्रीकृष्ण**—कां बरें ?

**राधा**—माझ्यावरचें तुझें प्रेम मनापासूनचें नाहीं ह्मणून.

**श्रीकृष्ण**— ( मोठ्यानें हंसतो )

**राधा**—मी हंसणारही नाहीं.

**श्रीकृष्ण**—खोटी गोष्ट. जगाच्या संसारांतला आनंद तुझ्या हंसण्यावर अवलंबून आहे. मग तूं न हंसून कसें चालेल ? दाखीव पाहूं तुजजवळचें चित्र ?

**राधा**—पण माझ्या चित्राची गोष्ट तुला कुणीं सांगितली ?

**श्रीकृष्ण**—तुझा हृदयानें.

**राधा**—माझ्या हृदयानें ?

**श्रीकृष्ण**--होय, तुझ्या हृदयानें. ज्या वेळीं तूं माझ्यावर जोरजोरानें संतापत होतीस, त्या वेळीं हळूंच तुझ्या नकळत तुला फसवून तूं काढलेलें चित्र रंग वाळण्याचे आधीं त्यानें मला दाखविलें.

**राधा**--पण त्याला माझ्या आज्ञेची जरूरी वाटली नाहीं? ही चोरी होय!

**श्रीकृष्ण**—माझें चित्र मला दाखविलें, त्यांत चोरटेपणा कसला आणि आज्ञेची तरी काय जरूरी?

**राधा**—कारण?

**श्रीकृष्ण**—राधेचें हृदय श्रीकृष्णाचें आहे.

**राधा**—श्रीकृष्णा, तूं फार कपटी आहेस.

**श्रीकृष्ण**—त्याचाच तर मघापासून मी विचार करीत आहें.

**राधा**--तो काय ह्मणून?

**श्रीकृष्ण**—कपट करण्याला कोणापासून शिकावें?

**राधा**—मग सांपडलाना एखादा गुरु? कीं अजून भेटायचा आहे?

**श्रीकृष्ण**--नुकताच मिळाला आहे.

**राधा**—त्याची माझी भेट होईल?

**श्रीकृष्ण**—न व्हायला काय झालें! पण माझ्या गुरूची भेट घेऊन तूं काय करणार?

**राधा**—शिष्याच्या गुणांची गुरूला ओळख करून देईन.

**श्रीकृष्ण**—तर मग तुझी भेट होणार नाहीं. एकाचे गुणांचा पाढा वाचायला दुसऱ्यानें आपले गुण उधळायला नकोत!

**राधा** नांव तरी सांगशील?

**श्रीकृष्ण**—नांव ऐकल्यावर आहे त्या जागीं तूं उभी राहाणार नाहींस.—माझा गुरु गोकुळांतली राधा!

**राधा**—श्रीकृष्णाची नव्हे?

**श्रीकृष्ण**—श्रीकृष्णाची राधा असती तर चित्राची गोष्ट त्याला सांगितल्याशिवाय ती स्वस्थ कशी राहती? श्रीकृष्णाच्या राधेला मुळीं चैनच पडलें नसतें. श्रीकृष्णानें कोणत्याही गोष्टींत राधेशीं आजपर्यंत परकेपणा दाखविला नाहीं, असें खुद्द राधेचें मनच साक्ष देत असतां तिनेंच स्वतः चित्राच्या बाबतींत त्याच्याशीं

असा परकेपणा कां दाखवावा?

**राधा**—राधेच्या मनांत श्रीकृष्णाविषयीं स्वप्नांत देखील परका भाव नसतो आजच तसा आरोप करण्याचें काय कारण?

**श्रीकृष्ण**—तर मग राधाकृष्णांच्या भेटीस इतका विलंब का लागावा? मनाचा संशयच खऱ्या स्नेहाला दूर ठेवितो.

**राधा**—राधेच्या हेतूचा हा धडधडीत विपर्यास होत आहे!

**श्रीकृष्ण**—मग यमुनेंत सांपडलेल्या प्रतिमेपेक्षां राधेचें चित्र सुंदर कां असूं नये?

**राधा**—हा तुझा दृष्टिदोष! तुझ्याच माझ्यावरील स्नेहास ओहोटी लागल्यामुळें प्रतिमेंतील चित्र मीं काढलेल्या चित्रापेक्षां तुला अधिक सुंदर दिसणें स्वाभाविक आहे.

**श्रीकृष्ण**—तसें नव्हे. ( राधेच्या हातांतलें चित्र हिसकावून घेऊन ) असलें ओबडधोबड चित्र दाखवून तुझ्या मनांत मला चकित करून सोडायचें होतें. त्याला माझा काय इलाज?

**राधा**-श्रीकृष्णा, असेच निरनिराळे संशय घेऊन आजपर्यंत तूं माझ्याशीं कितीदां तरी भांडलास. तरी अजून तुझी माझ्याशीं भांडण्याची हौस पुरली नाहीं का?

**श्रीकृष्ण**—ह्मणजे मी हौसेखातर तुझ्याशीं भांडलों वाटतें!

**पडद्यांत** [ अघासुराचा वध करणाऱ्या श्रीकृष्णाचा जयजयकार असो, असा जयघोष होतो. ]

**श्रीकृष्ण**—राधे, तूं पाहिजे तें ह्मण, पण केवळ तुझ्या स्नेहामुळेंच मी अघासुराचा वध करूं शकलों.

**राधा**—श्रीकृष्णा, अघासुराचा वध झाल्यानें कंस तुझ्यावर फार संतापला असेल. त्या दोघांचा मोठा स्नेह होता.

**श्रीकृष्ण**-राधेच्या प्रेमाचें दृढ कवच या श्रीकृष्णाच्या सभोंवतीं असल्यावर कंसाच्या रागाची कोण पर्वा करितो?

**राधा**-आणखी किती वेळ तूं असा इथें बोलत राहणार?

**श्रीकृष्ण**— मी सरस्वतीच्या समोर उभा आहें. सरस्वती प्रसन्न झाल्यावर

मुका जीव मुकाच कसा राहील ?

**राधा**-श्रीकृष्णा, हां पहा यमुना आपल्याच आनंदांत कशी गर्क आहे! तिच्या चित्ततरंगांच्या लहरी स्वानंदाच्या साम्राज्यांत मनसोक्त क्रीडा करीत असून तिचा हृदयसागर प्रेमानें उचंबळून जाऊन कसा बेहोष झाला आहे! आणि साहजिकच जगाकडे दुर्लक्ष होऊन स्वतःशींच पहा कशी ती हंसत डुलत आहे!

**श्रीकृष्ण**-हा तुझा प्रभाव! ज्या ठिकाणीं राधा तोच स्वर्ग! जेथें राधा नाहीं तें स्मशान होय!

**राधा**-श्रीकृष्णा, सूर्यनारायण अस्तास जाऊन पूर्वेकडे चंद्र उदय पावत आहे.

**श्रीकृष्ण**—जणुं काय चैतन्यांत चैतन्याचा लय होऊन त्यावर शांतीचा अभिषेक करणारा अमृतकलशच अवतीर्ण होत आहे!

**राधा**—आणि ह्या तारकाही आकाशांतील कुंजवनांत जमत आहेत.

**श्रीकृष्ण**—तसें नाहीं. त्या कलशांतुन टपटप गळणारे ते सुधाबिन्दु होत.

**राधा**—इथून जाऊं या आपण.

**श्रीकृष्ण**—कोठें ?

**राधा**—कुंजवनांत.

**श्रीकृष्ण**—तुला एकाएकीं कुंजवनाचें स्मरण झालें ?

**राधा**— [ भक्त जन सदा०—या चालीवर ]

**चित्तरंजना। चाल हरी! कुंजवना**
**नोहे रंजन। माझें त्याविण। हृदयमोहना! ॥ ध्रु० ॥**
**सुरतरुच्या शाखेसी। बांधुनिया दोल्यासी**
**झोंके घेऊन। गाणीं गाउन। रंजवूं मना ॥ १ ॥**
**करिं धरिं तूं बांसरितें। तिजला मी वाजवितें**
**भेदूं गगन। मोहूं भुवन। काढुनी स्वना ॥ २ ॥**
**तूं तोडीं मधुर फळें। वेंचिन मी रुचिर फुलें**
**अंतीं कवण। पावे जय न। कळुनि घेउंना ॥ ३ ॥**
**गुंफीं तूं मम वेणी। माझियाच सुमनांनीं**
**डोळे भरुन। घेई बघुन। रमविं कामना ॥ ४ ॥**

चिरुनि फळें तव वदनीं । घालिन मी स्वकरांनीं
तूझे वदनिं । माझे नयनिं । गुंतवूं गुणा ॥ ५ ॥
एकाही वचनासी । कुणि न वदूं कवणासी
कोपा धरुन । राहूं रुसुन । प्रेमजीवना ॥ ६ ॥
उकलोनी हृदयांतें । काय दिसे शोधुं तिथें
राधामाधव । पाहूं ह्या नव-। मधुर मीलना ॥ ७ ॥

**श्रीकृष्ण**—तुझी इच्छा. [ जातात. ]

---

## प्रवेश ५ वा.

( **दोन दासी** प्रवेश करितात. )

**जयंती**—चाललीस कुठें एवढ्या लगबगीनें चपले तूं? आणि हें काय हातांत?

**चपला**—हटकलेंस मला? अशी दळभद्रा आहेस तूं जयंते! मसणांत जात होतें मी! तुला काय पंचाईत?

**जयंती**—मोठी रावण मारायलाच निघाली होतीस कीं नाहीं? काय पण ऐट? एखाद्या राजाची राणी तरी व्हायची होतीस अशी ऐट मिरवायला! पण नशिबाची पडलीस भिकारडी!

**चपला**—मोठी आलीस आजीबाईचा शहाणपणा मिरवायला! त्या मथुरे-जवळ मिरवीत जा!

**जयंती**—त्या बिचारीनें तुझें काय घोडें मारलें बाई?

**चपला**—सटवीला चांगलें खायला, प्यायला, ल्यायला मिळत असतां कदा न् कदा रडव्या तोंडाची असते! मेलीच्या पांचवीला हंसणें पुजलेंच नाहीं कीं काय कुणाला ठाऊक! राणीसाहेब कशाला या बयेची इतकी काळजी घेत असतील कोण जाणे! तिच्याकडेच राणीसाहेबांनीं दिलेले हे दागिने आणखी साडी घेऊन जात होतें हो! तों मध्येंच तूं आडवी आलीस!

**जयंती**—मथुरेच्या दुःखाची कल्पना तुला कशी येणार! बाजारांत दमडी फेंकून आणलेली भाडोत्री तूं! गांव जळाला हनुमंत बाहेर!

**चपला**—आणि तूं ग? कंसमहाराजांची पट्टराणी वाटतें!

**जयंती**—अग, दोघी सारख्याच. म्हणून मथुरेची बरोबरी तुला मला कशाला हवी?

**चपला**—मी जर तिच्या जागीं असतें तर अशा वैभवांत कशी लोळत पडलें असतें. आणि या कंसराजाला पुष्कळसें आयुष्य दे अशी देवाची प्रार्थना केली असती. कशाची काळजी नाहीं न् कांहीं नाहीं. पण या कपाळकरंटीच्या नशीबांत पाहिजेना असा ऐषआराम भोगायला! दैव देतें आणि कर्म नेतें!

**जयंती**—चपले, तूं जन्माची दरिद्री. भिकाऱ्याचीच मुलगी आणि भिकाऱ्याचीच सून. तेव्हां तुला अधाशासारखें खाण्यापिण्यावांचून दुसरें काय सुचणार? अग, किती झालें तरी मथुरा आहे कुलशीलाची. तुझ्या–माझ्यासारखी उचली नव्हे. कुलवानाचें हृदय कुलवानाला माहीत. उचल्याला काय कल्पना त्याची? उचल्यानें फक्त आपली तुंबडी कशी भरेल याचीच सदा काळजी वहावी.

**चपला**—पण मथुरेला इतकें दुःख करायला कुणीं तरवार का तिच्या मानेवर धरली होती? कां नेहेमीं नेहेमीं रडावें? कंसमहाराजांनीं तिला आजवर काय कमी केलें आहे?

**जयंती**—कुलवंताचा मानभंग मरणापेक्षांही त्याला दुस्सह होतो. अग, उग्रसेनमहाराजांच्या काळीं मथुरा कशी आनंदांत मग्न होती. दुःखाचा लवलेश देखील तिला माहीत नव्हता. हजार जणींत मथुरा साधें लुगडें नेसून जरी गेली असली तरी त्या साऱ्यांपेक्षां हीच जास्त तेजस्वी दिसत असे. हिच्याकडे पाहून जमलेल्या सगळ्या बायकांनीं आपल्या माना लाजेनें खालीं घालाव्या आणि मत्सरानें आंतल्याआंत जळत रहावें, असें माझी आई सांगत असे. पण आज आपणच आपल्या डोळ्यांनीं पाहतों कीं, पंचपक्वान्नांचें ताट मथुरेपुढें मांडून लगेच त्या अन्नाचा एकही घांस तिच्या पोटांत कसा जाणार नाहीं याची तजवीज केली जाते. तिला कुणाशीं बोलूं देत नाहींत, कुणाकडे पाहूं देत नाहींत, कुठें जाऊं देत नाहींत. तिला सर्व तऱ्हेनें अगदीं चोर करून ठेविली आहे. तिच्या हालचालीवर सारखा अष्टौप्रहर खडा पहारा असतो. उग्रसेनमहाराजांच्या वेळीं जी मथुरा स्वतंत्रपणांत मन मानेल तशी संतोषानें नांदत होती, त्याच मथुरेला असल्या जाचानें या कंसराजाच्या अमदानींत पारतंत्र्यांतील गुलामगिरीच्या नरकांत आपण सडत आहों असें कां वाटूं नये? मग सांग चपले,

मथुरेनें दुःखी कां नसावें ?

**चपला**—पण कंसमहाराज तर आपलीं कामें नेहमीं तिलाच प्रेमळपणानें सांगत असतात !

**जयंती**—आपल्या ताटाखालचें मांजर म्हणून सांगतात. तिच्या दासीपणाची जाणीव तिला करून देण्यासाठीं म्हणून कंसमहाराज आपलीं कामें मथुरेकडून करवून घेतात. आणि आंतलें आपलें काळें मन तिला कळूं नये एवढ्याचसाठीं वरून प्रेमळपणा दाखविण्याचा ते आव आणतात. पण मथुरेला हें सारें कळत नाहीं असें नाहीं. आपलें सगळें वैभव लुबाडून घेऊन कंसानें आपणाला सर्वस्त्री भिकारीण—नागवी-उघडी करून ठेविलें आहे, ही कल्पना आतां मथुरेच्या हाडींमासीं खिळलेली आहे. कंसाची आपण दासी आहों आणि तो आपणांस दासीप्रमाणेंच किंबहुना दासीपेक्षांही कमी प्रतीची लेखतो, हें तिला पुरतेपणीं केव्हांच कळून चुकलें आहे. कालच पहाना, पेल्यांतील पाण्यांत कंसमहाराजांना कायसेंसें दिसत होतें, पण बिचारीला एवढ्याचसाठीं महाराजांनीं लाथेनें तुडविलें न ! याला मायाळूपणा म्हणतात का सूड म्हणतात सांग बरें ? बिचारी हाडाची गरीब म्हणून कुणापाशीं याचा ब्र काढीत नाहीं. आपल्या मनांतल्या मनांतच सारखी झुरत असते.

**चपला**—कंसमहाराज तरी मथुरेचा इतका छळ कां करितात ग ? एवढें कोणचें भय तिच्यापासून यांना वाटतें ! एवढे राजासारखे राजे असून यःकश्चित् बायकोमाणसावर दांत धरतात !

**जयंती**—या बायकोमाणसाचेंच तर कंसमहाराजांना मोठें भय वाटतें. या मथुरेसाठींच कंसमहाराजांनीं प्रत्यक्ष आपल्या बापाला—उग्रसेनमहाराजांना कैदेंत टाकलें. आणि असाच प्रसंग पुढें आपणा स्वतःवर येऊं नये म्हणून मथुरेला चोहीं बाजूंनीं असें जखडून टाकून तेव्हांपासून तिला कुणाच्याही नजरेस पडूं देत नाहींत—मथुरेचे कैवारी म्हणून अक्रूराला हद्दपार करून वसुदेवजींना सक्त कैदेंत ठेविलें आहे. लोकांवर पाहिजे तसा जुलूम सुरू आहे. आणि आपल्यापासून मथुरेची मुक्तता करण्याकरितांच श्रीकृष्ण जन्माला आला आहे असें समजून त्याला ठार मारण्यासाठीं नाना तऱ्हेच्या युक्त्याप्रयुक्त्या योजण्यांत कंसमहाराज हल्लीं गर्क असतात. आतां कंसमहाराजांना श्रीकृष्णावांचून दुसरें कांहीं-

ही दिसत नाहीं. श्रीकृष्णामुळें जवळजवळ वेडे होण्याच्या पंथास ते लागले आहेत असें कां म्हणेनास !–नको ही या दुस्मानाची चाकरी असें मला होऊन गेलें आहे. पण मथुरेसाठीं जीव तुटतो म्हणून डोकें खुपसून रहावें लागतें झालें.

**चपला**—ती पहा–मथुरा इकडेच येत आहे. बिचारी आपल्याच दुःखांत कशी अगदीं चूर होऊन गेलेली दिसते !

[ मथुरा प्रवेश करिते. ]

**मथुरा**—आतां कुणाला मी ही आपली कर्मकथा सांगूं ! आणि शरण तरी कुणाला जाऊं ? असे पदोपदीं घडणारे–काळजास घरे पाडणारे–अपमान आणखी किती सहन करूं ! या भेदक अपमानांनीं मन कसें फाटून गेलें आहे ! आपलेपणांत अठरा विश्वे दारिद्र्य पुरविलें, पण नरकांत पिचत पाडणारी ही श्रीमंती गुलामगिरी नको ! आतां या मथुरेला वाली तरी कोण उरला आहे ? एक वसुदेव कैद भोगतो आहे, तर दुसरा अक्रूर तपश्चर्या करीत बसला आहे. आणि काल तर तरुण तरुण अल्पवयी मुलांना अंधारकोठडींत खितपत पडावें लागलें आहे ! कोण ही दुर्दशा ! आणखी या मथुरेचे किती धिंडवडे निघायचे राहिले आहेत ईश्वरा, तूंच जाणे ! कुणाजवळ मन मोकळें करीन म्हणावें तर त्याची देखील चोरी झाली आहे. बिचारी जयंती चोरून मारून बोलायला पाहते, पण लगेच पहारेवाल्यांची वक्रदृष्टि तिच्या तोंडाला कुलूप घालते.–अस्सें आंतल्या आंत जळत रहावें लागतें.–या नीच गुलामगिरींतून मी आतां केव्हां मुक्त होणार ? ते उग्रसेनांच्या वेळचे दिवस आठवले म्हणजे–पण नको तें स्मरण ! ईश्वरा, काय ही माझी स्थिति !

**पडद्यांत** – [ कंसराजांनीं अक्रूराच्या हद्दपारीचा हुकूम करून घेतला असून वसुदेवजींस कोणालाही भेटण्याची परवानगी दिली आहे. अशी दवंडी तीन वेळ होते. ]

या पहारेकऱ्यांची दृष्टि कशी चुकेल ? ( मागें पाहते. ) जवळपास कुणी नाहींत वाटतें ? तर चल मथुरे, अक्रूराची भेट घेण्यास हीच संधी आहे.

[ मथुरा जलदीनें जावयाला पाहते, तोंच चपला तिला अडविते. ]

**चपला**—मथुरे, राणीसाहेबांनीं हे दागिने आणि ही साडी तुझ्याकडे पाठविली आहे. पाहून घे नीटः

**मथुरा**--रक्तबंबाळ झालेल्या काळजावर ही मलमपट्टी वाटतें! चपले, मायावतीला सांग, ही मलमपट्टी डोक्यावर घेऊन तुम्हीच नाचा म्हणावें.

[ जाते.]

**जयंती**—पाहूं आंत काय आहे तें ? ( गाठोडें सोडून ) हीच का ग साडी-न् दागिने चपले ? भारीच मोलाचे आहेत ग ?

**चपला**—चांगले हिऱ्यामोत्यांचे दागिने आणि भरजरी नवीन साडी द्याय-चीच राणीसाहेबांनीं आज्ञा केली होती. पण एवढे मोठाले दागिने मथुरेला सध्यांच अंगावर नीट घालतां येणार नाहींत, आणि भरजरीची साडीही इतक्यांत तिला चांगलीशी नेसतां यायची नाहीं, ह्मणून कोठीवानानें हे नकली दागिने आणि ही जुनेरी साडीच काढून दिली. यांचा मथुरेला चांगला सराव पडला ह्मणजे मग नवी जरीची साडी न् खरे दागिने तिला देतां येतील असें त्यानें मला आश्वासन दिलें आहे.

**पडद्यांत**—[ ' कोठें आहे मथुरा ? ' ' कोठें आहे मथुरा ? ' असा एकच गलबला होतो. चपला भिते. ]

**जयंती**—खबरदार चपले, मथुरेविषयीं एक चकार शब्द तोंडांतून काढ-लास तर !

**चपला**—मग मला पकडतील, तुरुंगांत टाकतील, सुळावर देतील. नाहीं,—मी सांगणार !

**जयंती**-माझे ऐक. कांहीं होत नाहीं. तूं तुस्ती उगी रहा. अशी भिऊं नकोस.

[ पुन्हां गलबला होतो. ]

**चपला**—नाहीं, मी सांगणार ! तूं कांहीं म्हटलेंस तरी मी सांगणार ! मला जिवाची भीति वाटते. मी सांगणार.

**जयंती**—तूं एकटी मेलीस तरी हरकत नाहीं. मथुरेला स्वातंत्र्य मिळेल तर तुझ्यासारख्या हजारों-लाखों जीवांचें कोटकल्याण होईल !

[ कांहीं राजसेवक प्रवेश करितात. ]

**राजसेवक**--कोठें आहे मथुरा ?

**जयंती**—आम्हांला माहीत नाहीं.

**राजसेवक**—माहीत नाहीं ? माहीत कसें नाहीं ? मथुरा इकडेच आल्याचें

आह्मांला कळलें.

**जयंती**— आम्ही दोघी मथुरेचीच वाट पहात उभ्या आहोंत. राणीसाहेबांनीं दिलेले हे दागिने न् सार्डा तिला द्यायची आहे. इकडे ती आलीच नाहीं मुळीं. दोघी अश्शा इथें उभ्या आहोंत.

**राजसेवक**—पकडा या हरामखोर दासींना! आणि उलट्या टांगा! ह्मणजे पटकन बाहेर पडेल सारें!

[ चपला कांहीं बोलावयाला पाहते तों चटकन तिच्या तोंडावर जयंती आपला हात देते. ]

**राजसेवक**--ही गेली तरी कोठें? [ सर्व जातात. ]

---

## प्रवेश ६ वा.

[ **मथुरा** प्रवेश करिते. ]

**मथुरा**--अक्रूरा, या मथुरेचा हंबरडा अजून तुझ्या कानावर आदळला नाहीं काय? या गिरिशिखरावर ही तुझी तपस्या आणखी किती दिवस चालणार?

**अक्रूर**--तुझा हंबरडा माझ्या कानावर आदळून काय उपयोग? माझ्याच्यानें त्याचा प्रतिकार कितीसा होणार?

**मथुरा**—कांहींच का मार्ग सांपडत नाहीं?

**अक्रूर**—आमचा मार्गदर्शक साखळदंडाच्या भारानें बंदिशाळेंत जर्जर होऊन पडला आहे. त्याच्या सुटकेशिवाय सध्यां आम्हांला कांहींही सुचत नाहीं.

**मथुरा**—त्याची सुटका अखेरपर्यंत नाहींच झाली, तर तुम्ही असेच ऊर बडवीत मृत्यूच्या स्वाधीन होणार काय?

**अक्रूर**—तसे आपल्या शक्तीच्या आणि अकलेच्या मानानें आह्मीं कित्येक जण शक्य तितकी खटपट करीतच आहोंत. हालअपेष्टांमधून मथुरेची मुक्तता करण्यासाठीं त्या परमेश्वराची या तपस्येच्या योगानें अनन्य भावानें मी स्वतः प्रार्थना करीत आहें. यापेक्षां मथुरे, मी तरी व्यक्तिशः अधिक तें काय करूं शकेन?

**मथुरा**—पण या निष्क्रिय प्रार्थनेच्या बडबडीला भुलून जाऊन परमेश्वर तुमच्या साह्याला धांवून येईल असें तुम्हांला खात्रीनें वाटतें?

**अक्रूर—**मग या अक्रूराच्या हातून यापेक्षां आणखी जास्त काय व्हावें अशी

तुझी कल्पना आहे?

**मथुरा**—मनुष्याचें मनुष्यत्व म्हणजे त्याचा पुरुषार्थ. आणि तो पुरुषार्थ बसल्या ठिकाणाहून मनुष्याकरवीं घडत नाहीं हेंही जाणत असशीलच. पण तो पुरुषार्थ, स्वतःचें ऐहिक वैभव वाढविण्यापेक्षां, दुःखाच्या गर्तेत, हालअपेष्टांच्या होमकुंडांत आणि गुलामगिरीच्या नरकांत खितपत पडलेल्या या तुझ्या जन्मभूमीच्या–या तुझ्या मातृदेवतेच्या–या मथुरेच्या कल्याणार्थ खर्ची पडला तर मनुष्य-जन्माचें सार्थक झालें, असें नाहीं का तुला वाटत?

**अक्रूर**—हें मला कळत का नाहीं मथुरे?

**मथुरा**—मग अडचण कशाची? या मथुरेच्या गळयास दास्याचा फांस लागला असतां–या मथुरेच्या कपाळास 'दासीपणाचा काळा डाग' कायमचा चिकटला असतां–या मथुरेला कंसासारखा दुष्ट राजा लाथेनें सदैव तुडवीत असतां–अद्याप अडचणीचा तुला मोठा बाऊ वाटतो? अक्रूरा, खरा कर्तव्यनिष्ठ मनुष्य असतो तो अशा मार्गांत येणाऱ्या अडचणींच्या धगधगींत निखाऱ्यांना स्वतःच्या पायानें विझवून आपलें दमदार पाऊल पुढें टाकीत असतो! स्वतःच्या कर्तव्यापुढें तो प्रत्यक्ष काळालाही भीत नाहीं.

**अक्रूर**—तशी अडचण कसली नाहीं ह्मणा, पण तितकी बुद्धिच चालत नाहीं.

**मथुरा**—बुद्धि चालत नाहीं असें ह्मणण्यापेक्षां अंगांत तितकें धैर्य नाहीं असें कां ह्मणत नाहींस? आणि धैर्य नसल्यामुळें वाटावा तितका स्वतःच्या कर्तबगारिविषयीं आत्मविश्वास वाटत नाहीं!

**अक्रूर**—सर्व मनुष्यें सारखींच कशीं असतील? त्यांत कोणी तरी एक सांगणारा आणि पुष्कळसे त्याप्रमाणें चालणारेच असतात.

**मथुरा**—पण सांगणारा जन्मास पुरतो का? उद्यां सांगणारा मार्गदर्शक दुर्दैवानें मरण पावला, तर तुह्मी सारे ऐकणारे अनुयायी त्याच्या मृत्यूनें हतबल होऊन लागलीच यमुनेच्या डोहांत जीव द्याल काय?

**अक्रूर**—मग कांहीं तरी मार्ग काढावाच लागेल.

**मथुरा**—पण तेंच जर नेत्याच्या समक्षच धैर्याचीं आणि बुद्धिबलाचीं मोठमोठीं कामें पार पाडलीं, तर आपल्या पाठीमागें स्वतंत्र बुद्धीनें काम

करणारीं धैर्यशाली माणसें आहेत याचा नहीं का त्याला आनंद वाटणार ?--सांग अक्रूरा, माझ्याकरितां वसुदेवाच्या गैरहजिरींत आजपर्यंत तुह्मीं अनुयायांनीं काय केलें ?

**अक्रूर**—आह्मीं कांहींच का केलें नाहीं असें तुला वाटतें ?

**मथुरा**--असे हातपाय गाळून माझ्यावरचा जुलूम शिखरापर्यंत पोहोंचवून वसुदेवाच्या कर्तबगारीचें अस्तित्व नामशेष झाल्याचें मात्र कंसाच्या नजरेस आणलें !

**अक्रूर**--त्याला आम्हीं काय करावें ? नाइलाज आहे !

**मथुरा**—लाज वाटली पाहिजे असले नेभळट शब्द तोंडानें उच्चारायला ? एखादे वेळे अभिमानी असतां तर या मथुरेच्या आणि वसुदेवाच्या मुक्ततेसाठीं सारें आकाशपाताळ एक करून सोडून त्या दुष्ट कंसाला एका क्षणांत रसातळास पाठविलें असतें. पण तुम्ही इतके निर्लज्ज, बेशरम, नादान आहांत कीं, सगळया जगाची लाजलज्जा वाटून पिऊन स्वस्थ बसलांत !

**अक्रूर**--मग आह्मीं करावें तरी काय ? त्या कंसाच्या प्रचंड शक्तीशीं टक्कर देऊन एकदम आम्हीं सर्वांनींच भस्मसात् होऊन जावें, असें का तुझें ह्मणणें आहे ? मग तुझी काळजी कोण वाहील ?

**मथुरा**--मेलांत म्हणून बिघडलें कुठें ? दुसऱ्याच्या काळजीचा उगाच टेंभा मिरविणारे तुझ्यासारखे बोलके षंढ जेवढे मरतील तेवढे चांगलें. तितकी क्रिया-शून्यता तरी कमी होईल. अक्रूरा, तुझ्यासारखे हजारों रेडे प्रत्यहीं जन्माला येतात आणि मरून जातात. त्यांची कोण एवढी वास्तापुस्त करितो ! त्या रेड्यांसाठीं कोण एवढें अडून बसलेंय ! तुम्हां नामर्दांच्या भेकड छातीवर निधडेपणानें अस्सा पाय देऊन तरुणमर्द वीर पुढें येतील आणि या मथुरेचा उद्धार करतील !

**अक्रूर**—माते मथुरे, हे वाग्बाण आतां पुरे कर. तुझ्यासमोर श्रीकृष्णपरम्याची मी शपथ घेऊन सांगतों कीं, कंसाच्या गुलामागिरींतून सोडवून मातृदेवता मथुरेला स्वतंत्र केल्याशिवाय हा अक्रूर आजपासून अन्नग्रहण करणार नाहीं.

**पडद्यांत**--[ अक्रूराच्या हद्दपारीचा हुकूम कंसराजानें काढून घेतला असून वसुदेवजींना कोणालाही भेटण्याची परवानगी दिली आहे. अशी पुन्हा दवंडी होते. ]

मथुरे, हा माझ्या प्रतिज्ञेस शकुनच झाला आहे. तूं निर्धास्त ऐस. आतां वसुदेवजींचीही मला भेट घेतां येईल. तर आतां तिकडेच जातों. मला आशीर्वाद दे.

[ नमस्कार करून अक्रूर निघून जातो. ]

( राजसेवक प्रवेश करितात. )

**राजसेवक**--ही पहा मथु । डोंगराळांत पळून आली आहे. धरा हिला. बांधा मुसक्या.--या सटवीनें कितों आह्मांला त्रास दिलान् !

[ मथुरेला धरून दोरांनीं जखडून बांधतात. ]

**मथुरा**—( जातां जातां ) अक्रूरा, धांव ! [ सर्व जातात. ]

( पडदा पडतो. )

---

**अंक पहिला समाप्त.**



# अंक दुसरा

## प्रवेश १ ला.

[ जयंती प्रवेश करिते. ]

**जयंती**--अक्रूरांनीं दिलेली ही वसुदेवजींची चिठ्ठी मथुरेला कशी पोहोंचवावी ? मथुरा इतक्या कडेकोट बंदोबस्तांत आहे कीं, सूर्यकिरण देखील तिथें डोकावूं शकत नाहीं. मग मनुष्य कुठून जाऊं शकेल ? आणि मथुरेची मैत्रीण म्हणून माझ्यावर तर सर्वांचा डोळा ! मथुरेविषयीं एखादा अनुकूल शब्द तोंडांतून निघणें हें सुद्धां कंसाच्या राज्यांत आज पाप झालें आहे ? काय हे विचारीचे हाल ! --हो, बरी आठवण झाली ! मथुरेचें अन्न-पाणी चपला घेऊन जात असते. तिलाच सगळें तिथलें विचारून पाहूं, म्हणजे वित्तंबातमी लागेल.

[ जाऊं लागते. तोंच चपला प्रवेश करिते. ]

**चपला**--चाललीस जयंते ! जरा थांब. माझें एक तुझ्याशीं काम आहे.

**जयंती**--तूं आज अशी उदास कां दिसतेस ? काय होतेंय तुला ?

**चपला**--माझी आई फार आजारी आहे.

**जयंती**--काय झालें तिला ?

**चपला**--कोण जाणे, कळत नाहीं. तिच्याजवळ सारखें बसावें लागतें. दादा गांवाला गेला. घरांत दुसरें कोणी नाहीं.

**जयंती**--मग मी येऊं का सोबत तुझ्या तुझ्या घरीं ?

**चपला**--तितकीच सध्यां कांहीं जरूरी नाहीं. पण मथुरेचें आजचें अन्न-पाणी माझ्याबदली तूं घेऊन जाशील ना ?

**जयंती**--तिथें तर अगदीं कडक पहारा आहे. कोण जाऊं देईल मला ?

**चपला**--ती नको तुला काळजी. मी खुणेची अंगठी देतें, ती प्रत्येक पहाऱ्यावर दाखविली म्हणजे कुणीही तुला मग अडविणार नाहीं.

**जयंती**--पण तुझीं खूण मला कशी चालेल ?

**चपला**--जवळ फक्त खूण असली म्हणजे झालें. मग ती कुणीही असो ! तुला कोणचीही अडचण पडणार नाहीं याची मी खात्री देतें.

**जयंती**—पहा बरं चपले! मी बापडी तुझ्यासाठीं जातें. यांत तुझ्यावर कांहीं किटाळ न येवो म्हणजे झालें. नाहीं तर तुला नसता त्रास व्हायचा! बरें करितां ब्रह्महत्या!

**चपला**—होऊं दे. चल, तुला अंगठी देतें.

**जयंती**—( जातां जातां ) मथुरेचे ग्रह फिरूं लागले म्हणायचे!

[ जातात. ]

## प्रवेश २ रा.

[ **दोन गवळी** प्रवेश करितात. ]

**एक गवळी**—श्रीकृष्ण जाणार, मग या गोकुळाचें कसें होईल?

**दुसरा गवळी**—कां हो एवढे विचारांत दिसतां? श्रीकृष्ण जाणार ही गोष्ट खरी कां?

**एक गवळी**—कालच्या रात्रीं मला तसें स्वप्नच पडलें! माझा कांहीं स्वप्नावर फारसा विश्वास नाहीं ह्मणा—पण काय असेल तें असो, हें स्वप्न खरेंच ठरणार असें तेव्हांपासून मला वाटतें आहे. तुह्मांला कोणीं सांगितलें हें?

**दुसरा गवळी**—श्रीकृष्ण जाणार हें एकाएकींच माझ्या मनाला वाटायला लागलें पहा! त्याला कारण नाहीं, कांहीं नाहीं. पण तेव्हांपासून मी सारखा गोंधळून गेलों आहें.

**एक गवळी**—श्रीकृष्ण गेल्यावर आपल्या गोकुळाची काय अवस्था होणार या विचारानें माझें मस्तक तर फिरूं लागलें आहे. तें यमुनेचें वाळवंट, तें कुंज-वन, ते गोपाळ, त्या गवळिणी, ती मुरली, त्या गाई, तीं छोटीं छोटीं वासरें, तो आनंद—या सर्वांचें मला वाटतें आतां स्मशान होणार! मग या गोकुळाला विचा-रतो कोण? श्रीकृष्ण म्हणजेच गोकुळ. या अभागी गोकुळानें पूर्वजन्मीं असें कोणतें पातक केलें कीं त्या योगानें श्रीकृष्णाच्या बालपणींच त्याचा त्याला वियोग होणार आहे?

**दुसरा गवळी**—आणि राधा?

**एक गवळी**—श्रीकृष्ण गेल्यावर राधा थोडीच इथें राहणार आहे! तीही त्याच्या मागोमाग जाणारच. मला वाटतें, श्रीकृष्ण गोकुळांतून जायच्या आधीं

हें सारें गोकुळच्या गोकुळ पृथ्वीच्या पोटांत गडप होईल तर बरें !

**दुसरा गवळी**—आपण आतां राधेकडे जाऊं. श्रीकृष्णाच्या जाण्याचें तिला सगळें माहीत असेल. उगाच मनःकल्पित गोष्टींवर भरंवसा ठेवून चिंता करण्यांत अर्थ नाहीं. चला तर मग.

[ गवळी जातात. दोन गवळिणी प्रवेश करितात. ]

**एक गवळण**—काय ग कमळे, पाण्यांत घागर बुडविली असतांना ती खालून श्रीकृष्ण ओढतो आहे, असा मला रोज भास व्हायचा; तो आज कां ग झाला नाहीं? या गोकुळांतील कणन् कण कृष्णमय असतां हें यमुनेचें पाणी आजच कृष्णरहित कसें झालें?

**दुसरी गवळण**—मलाही बाई आज असेंच चुकल्याचुकल्यासारखें होत आहे. आपला श्रीकृष्ण आपणांला सोडून जाणार याचें मला कालच रात्रीं स्वप्न पडलें! काय ग सरले, तें स्वप्न खरें ठरेल कां?

**एक गवळण**—'श्रीकृष्ण जाणार' 'श्रीकृष्ण जाणार' असें जो तो सगळ्या गोकुळभर आज ह्मणून राहिला आहे खरा. कां बरें श्रीकृष्ण जाणार? तुला कांहीं कळलें का यांतलें इंगित? खरेंच का आपणांला टाकून श्रीकृष्ण गोकुळांतून जाईल? माझा तर बाई या गोष्टीवर विश्वासच बसत नाहीं.

**दुसरी गवळण**—पण आजच श्रीकृष्णाला जायला असें कोणचें कारण घडलें? सरले, राहून राहून माझ्या मनाला असेंच वाटतें कीं, गोकुळास आणि आपणांस सोडून श्रीकृष्ण जाणार!

**एक गवळण**—कां बरें श्रीकृष्णानें जावें इथून? अगदीं खचित श्रीकृष्ण गोकुळांतून जाणारच असें तुला वाटतें? कां वाटतें सरले? असा कोणचा अपराध श्रीकृष्णाचा आपणांकडून घडला कीं, एकदम आपणां सगळ्यांना सोडून श्रीकृष्णानें चालतें व्हावें? श्रीकृष्णाची प्रत्येक करणी आपणांला आनंद देऊन मोह पाडीत होती. मग अपराध घडणार कसा? गोकुळांतून जाण्यासाठीं श्रीकृष्णानें आपल्या मनचा तर एखादा अपराध शोधून काढला नाहीं? पण छे? ही कल्पना श्रीकृष्णाविषयीं तरी नकोच. मग कां श्रीकृष्ण जाणार?

**दुसरी गवळण**—तो पहा ऐक—साऱ्या गोकुळभर, 'श्रीकृष्ण जाणार' ह्मणून एकच आवाज होऊन राहिला आहे!

**पडद्यांत**—[ श्रीकृष्ण जाणार, श्रीकृष्ण गोकुळ सोडून जाणार, श्रीकृष्ण गोकुळांतून जाणार, असा एकच आवाज होतो. ]

**एक गवळण**—श्रीकृष्णाचें मन इतकें कसें निष्ठुर झालें !

**दुसरी गवळण**—चल, आतां अगोदर राधेकडे आपण जाऊं आणि तिलाच विचारूं, ह्मणजे सगळें खरें खोटें कळून येईल. तिला ह्यांतलें ठाऊक असेलच.

[ गवळिणी जातात. कांहीं गोपाळ प्रवेश करितात. ]

**एक गोपाळ**—का रे वाकड्या, आमचा श्रीकृष्ण जाईल का रे ?

**दुसरा गोपाळ**—आमचा श्रीकृष्ण नाहीं का ?

**तिसरा गोपाळ**—अरे हो, आपल्या सगळ्यांचाच श्रीकृष्ण आहे !

**एक गोपाळ**—तर मग श्रीकृष्ण जाणार कसा ?

**दुसरा गोपाळ**—मग आपल्याला कुस्ती कोण शिकवील ?

**तिसरा गोपाळ**—आणि तलवार रे ?

**दुसरा गोपाळ**—आणि यमुनेंत पोहायला रे ?

**एक गोपाळ**—ह्मणूनच तर म्हणतों, श्रीकृष्णाइतकें चांगलें आपल्याला पुढें कोण शिकवील ? त्याला सारें कांहीं येतें. मग श्रीकृष्ण जाणार जाणार तो कसा जाणार ? श्रीकृष्ण जाऊन आपल्याशीं मग त्याच्यासारखें दुसरें खेळणार आहे कोण ? सांग बरें !

**दुसरा गोपाळ**—आपण तर जाऊंच देणार नाहीं बुवा श्रीकृष्णाला. तो जायच्या वेळीं त्याला मुळीं धरूनच ठेवीन मी !

**तिसरा गोपाळ**—आणि मी तर त्याची एका पायांतली वहाणच लपवून ठेवणार आहे ! रिकाम्या पायानें श्रीकृष्ण मग कसा जाणार ? त्याला राहिलेंच पाहिजे !

**एक गोपाळ**—आणि मी तर श्रीकृष्णाची मुरलीच पळविणार आहे ! मग तो कसा जातो तेंच पहातों ! श्रीकृष्ण मुरलीला एक पळभरसुद्धां कोठें विसरत नाहीं. त्यानें जाणार नाहीं असें शपथ घेऊन कबूल केल्याशिवाय मुरली त्याला मी देणारच नाहीं मुळीं ! मग कसा जाणार श्रीकृष्ण ? राहिलाच पाहिजे ! काय रे गण्या ?

**दुसरा गोपाळ**—नाहींच ऐकलें तर शेवटीं आपणच आपलें सारें खेळाचें

सामान घेऊन श्रीकृष्णाबरोबर जाऊं. बाकी श्रीकृष्णाला एकटा कांहीं जाऊं देणार नाहीं ह्मणा.

**तिसरा गोपाळ**—अरे, असें काय करतोस अगदीं? भित्री भागुबाई! आतांच्या आतां आपण राधेकडे जाऊं चल, आणि तिला विचारूं श्रीकृष्ण जाणार कीं काय ह्मणून? ती सारें खरें खरें सांगेल.

[ गोपाळ जातात. गोकुळांतील प्रत्येक पुरुष, स्त्री आणि मुलगा विदेही स्थितींत " राधे, श्रीकृष्णाला जाऊं देऊं नकोस !" असें ह्मणत राधेसह प्रवेश करितात. ]

**राधा**—श्रीकृष्ण जाणार नाहीं !

**गोकुळवासी**—राधे, आमच्या श्रीकृष्णाला जाऊं देऊं नको बरें? श्रीकृष्ण गोकुळाचा प्राण आहे. श्रीकृष्ण गेला तर गोकुळ जिवंत राहाणार नाहीं!

**राधा**—श्रीकृष्ण गोकुळांतुन जाणार नाहीं! तुह्मी निर्धास्त असा! श्रीकृष्ण गोकुळ सोडून कदापि जाणार नाहीं!

**गोकुळवासी**—पहा बरें राधे, नाहींतर श्रीकृष्ण तुलाच बरोबर घेऊन जाईल!

**राधा**—नाहीं. राधाकृष्ण हे दोघेही गोकुळाची ही भूमि सोडून केव्हांही जाणार नाहींत. ( विचारमग्न होते. )

पद [ कानडा-त्रिवट ]

**जीव गृहाविण राहिल केंवी । गृह जीवाविण शून्य सदाही ॥ ध्रु० ॥ जीव विहंगम, गृह कुटिरासम । चलाचलांचा भुवनमनोरम । संगम हा जगिं होई ॥ १ ॥ कितिहि जाय दुरि विहंग अंबरिं । ओढिस घेउनि अंतीं कुटिरीं । परतुनियां तो येई ॥ २ ॥ सतत वस्तु चल चलित न राही । अचलीं कधि तरि स्थिर ती होई । जीव शांत गृहिं तेंवी ॥ ३ ॥ राहिल पळघडि गृह जीवाविण । परि न राहि जिव गृहाविणें क्षण । गृहिंच मोल त्या येई ॥ ४ ॥**

[ राधा पद ह्मणत असतां 'हरे कृष्ण' 'राधा कृष्ण' असें ह्मणत ह्मणत गोकुळवासी जन जातात. ]

**राधा**—श्रीकृष्ण जाणार –माझा श्रीकृष्ण जाणार–या भरलेल्या गोकुळांतून राधेचा श्रीकृष्ण निघून जाणार? कुणीं सांगितली या लोकांना ही बातमी? अगदीं लहानथोरांपर्यंत ही गोष्ट एकदमच कशी पसरली? ही वार्ता अशुभ आहे. श्रीकृष्ण जाणार ह्मणजे कुठें जाणार? राधेच्या मर्जीविरुद्ध श्रीकृष्ण गोकुळांतून जाणार असें म्हणणारा भोळा असला पाहिजे.–श्रीकृष्ण गेल्यावर राधेनें कुणाशीं बोलावें? कुणाशीं हंसावें? कुणाशीं रुसावें? कुणाचा मुखचंद्र पाहून आनंद मानावा! आणि दुःखी तरी कुणाच्या विरहानें व्हावें? श्रीकृष्ण गोकुळांत आला, राधा होती ह्मणून; श्रीकृष्णानें मोठमोठाले पराक्रम केले, राधेला धन्यता वाटावी ह्मणून; आणि श्रीकृष्णानें मुरलीची तान घेतली, राधा मनोमय लीन व्हावी म्हणून! मग राधेला सोडून श्रीकृष्ण कसा जाणार? श्रीकृष्ण ह्मणजे राधेचा हर्ष आहे. श्रीकृष्णाशिवाय राधेचें जीवित म्हणजे निर्माल्य!–काय, राधेनेंही श्रीकृष्णाबरोबर जावें? नाहीं–श्रीकृष्णाबरोबर राधा जाणार नाहीं! राधेबरोबरच श्रीकृष्णाला राहिलें पाहिजे.–श्रीकृष्ण राधेचा आहे!

पद ( जय उनकी देश० या चालीवर )

**आराम जो मनाचा। तो श्याम राधिकेचा॥ ध्रु०॥**
**चैतन्य जो जगाचें। जो प्रेम सज्जनांचें॥**
**आनंद योगियांचा। तो श्याम राधिकेचा॥ १॥**
**दुष्टांस काल गमतो। कालासि काल दिसतो॥**
**थोरांत थोर साचा। तो श्याम राधिकेचा॥ २॥**
**सौंदर्य चारुतेचें। माधुर्य माधुरीचें॥**
**आधार जो गुणांचा। तो श्याम राधिकेचा॥ ३॥**

राधेपासून त्या श्यामसुंदर श्रीकृष्णाला घेऊन जाण्याला जगांत आज कोण समर्थ आहे!

[ अक्रूर प्रवेश करितो. ]

**अक्रूर**–राधे, श्रीकृष्णाची भिक्षा मागण्याला हा अक्रूर पदर पसरून तुझ्यासमोर उभा आहे.

**राधा**—हा याचक कृष्णदानाला अपात्र आहे!

**अक्रूर**—दानाला पात्र असल्याशिवाय याचक केव्हांही दाराशीं येत नाहीं.

**राधा**—दानाला असेल. पण कृष्णदानाविषयीं नाहीं !

**अक्रूर**—ज्या योग्यतेचा याचक, त्याच योग्यतेचें त्यानें आपलें दानही मागितलें तर बिघडलें कोठें ? याचकालाही योग्यता असतेच.

**राधा**—याचक म्हणजे इथून तिथून सारे सारखेच. त्यांच्यामध्यें भेदाभेद मुळींच नसतो. दाता जें देईल तें पदरांत घेऊन संतोष मानून याचकानें चालतें व्हावें !

**अक्रूर**—पण याचकाला नको अशी भिक्षा दात्यानें पदरांत टाकली तर ?

**राधा**—याचकाला इच्छाच नाहीं. विवक्षित वस्तूच्या इच्छेची इच्छा सोडल्याशिवाय याचक मुळीं याचना करायला घराच्या बाहेरच पडत नाहीं. तसा नसेल तर तो याचकच नव्हे !

**अक्रूर**—तसा हा मेलेल्या इच्छेचा याचक नव्हे. हा जिवंत इच्छेचा याचक होय. म्हणूनच त्याला जिवंत भिक्षा पाहिजे.

**राधा**—हें ब्रह्मज्ञान मला नको आहे. श्रीकृष्ण ही राधेची संपत्ति आहे. आणि ही श्रीकृष्णसंपत्ति दुसऱ्याला देण्याविषयीं राधा अतिशय कृपण आहे.

**अक्रूर**—पण राधेनें आपला कृपणपणा सोडल्याशिवाय मथुरेचें कल्याण होणार नाहीं.

**राधा**—कां बरें ?

**अक्रूर**—कंसाचा वध झाल्याशिवाय मथुरेला स्वातंत्र्य मिळणार नाहीं, आणि कंसवध श्रीकृष्णावांचून होणार नाहीं; आणि राधेच्या आज्ञेखेरीज श्रीकृष्ण मथुरेला येणें अशक्य आहे, असें आमच्या वसुदेवजींचें म्हणणें आहे.

**राधा**—दुसऱ्याला भिकारी करून स्वतः श्रीमंत होण्याची विद्या तुमच्या वसुदेवजींस चांगली अवगत आहे म्हणायची !

**अक्रूर**—पण या व्यवहारांत तूं भिकारीण होणार नसून तुझ्या श्रीकृष्णसंपत्तींत उलट कीर्तिसंपत्तीची भर पडून तूं दुप्पट श्रीमंत होणार आहेस !

**राधा**—पण मजजवळ श्रीकृष्णसंपत्ति असल्यावर मग मला दुसऱ्या कोणत्याही संपत्तीची हाव नाहीं.

**अक्रूर**—मनाचा श्रीमंत असल्यावर मग जवळच्या सुद्धा संपत्तीची त्याला जरूरी नाहीं.

**राधा**—मला हें कबूल नाहीं. जवळची संपत्ति बाळगून देखील मनुष्य मनाचा श्रीमंत राहूं शकतो.

**अक्रूर**—मनुष्य मनानें श्रीमंत असून भागत नाहीं, तर कृतीनें श्रीमंत पाहिजे. धनिकाची संपत्ति ही जगतापासूनच मिळविलेली असते. पण त्या संपत्तीचा विनियोग धनिक जर जगत्कल्याणाकरितां करणार नाहीं, तर ती संपत्तिही त्याचा त्याग केल्याशिवाय राहत नाहीं.

**राधा**--जगताची संपत्ति जगताच्याच उपयोगीं पडूं नये असें कोण म्हणेल? पण अनाठायीं खर्च झालेली संपत्ति जगाचें कल्याण करीत नाहीं, तर उलट त्या जगताला अधोगतीस नेते.

**अक्रूर**—जगतासून मिळविलेल्या संपत्तीवर जितका मिळविणाऱ्याचा तितकाच जगताचाही हक्क असतो. तर मग राधे, श्रीकृष्णावर जशी तुझी सत्ता आहे तशीच आमचीही पण आहे. श्रीकृष्ण सर्वांचा आहे. श्रीकृष्ण जगताचा आहे.

**राधा**—नाहीं; श्रीकृष्ण राधेचा आहे!

**अक्रूर**—चल, हें आपण श्रीकृष्णालाच विचारूं.

**राधा**—तूंच जा, मला जरूर नाहीं!

**अक्रूर**—मग श्रीकृष्ण माझ्याबरोबर मथुरेला आल्यास तुझी कांहीं हरकत नाहीं ना?

**राधा**—तेंही त्यालाच विचार.

[ जाते. ]

**अक्रूर**—राधा रागानें निघून गेली. आतां श्रीकृष्ण मथुरेला कसा यावा? श्रीकृष्णाला मागितल्याबरोबर राधा रागानें संतप्त झाली आहे! कां होऊं नये? श्रीकृष्ण कोणाला सोडावासा वाटणार आहे? तशांत राधा आणि श्रीकृष्ण म्हणजे एका हृदयाच्या दोन व्यक्ति.--हरकत नाहीं. आणखी प्रयत्न करून पाहूं. माते मथुरे, तुझा वरद हस्त माझ्या इच्छित कार्याला यश देईल, ही माझी खात्री आहे.–चला, श्रीकृष्णाचीच आतां भेट घेऊं.

[ जातो. ]

## प्रवेश ३ रा.

[ **जयंती** तुरुंगांतील प्रत्येक पहाऱ्यावर जात असतां पहारेकरी तिला अडवितो. पण खुणेची आंगठी दाखविल्यावर तिला तो जाऊं देतो. शेवटीं तुरुंगांत **मथुरे**च्या समोर तिची भाकरी आणि पाणी ठेवून ती परतते. ]

**जयंती**—एवढा कंसराजासारखा राजा या वैभवशाली मथुरेचा अधिपति असूनसुद्धां तिला पोटभर दोन वेळां खायलाही मिळूं नये ! केवळ चतकोर भाकरीवर अर्धपोटीं राहणें भाग पडावें ! काय हा दैवाचा खेळ ? आणि तेंही खरेंच आहे. कारण—

**पद** [ जगताचें वा स्वतांचें० या चालीवर ]

**परवशतापाश दैवें ज्यांच्या गळां लागला**
**सजिवपणीं घडती सारे मरणभोग त्याला**
**असुनि खरा मालक घरचा चोर म्हणति त्याला**
**मातृभूमि ज्याची त्याला होय बंदिशाला ॥ १ ॥***

[ जाते. ]

**मथुरा**—आज भाकरी न् पाणी जयंतीनें आणलें ? यांत कांहीं तरी तिचा विशेष हेतु असावा. पाहूं बरें भाकरी सोडून. ( भाकरी सोडून पाहते. भाकरीच्या पापुद्र्याच्या खालीं कागदाची एक घडी लपविलेली तिला सांपडते. ) मला वाटलेंच. हेंच जयंतीचें आजचें इथें येण्याचें कारण. पाहूं बरें यांत काय लिहिलें आहे तें. ( पत्र वाचते )

" माते मथुरे, ईश्वरावर भरंवसा ठेवून अशाच हालअपेष्टा आणखी कांहीं दिवस सहन कर. मनाचा धीर खचूं देऊं नकोस. श्रीकृष्णाला आणण्यासाठीं अक्रूर गोकुळास रवाना झाला आहे. लवकरच तूं स्वतंत्र होशील. जुलमी आणि अन्यायी वर्तनाची गय परमेश्वर फार दिवस करीत नाहीं. करितां निराशेच्या भरीस पडून जिवाला अपाय करून घेण्याचा कसलाही दुष्ट विचार मनांत आणूं नकोस, एवढीच तुला माझी प्रार्थना आहे. माझी प्रकृति ठीक आहे. काळजी करूं नकोस.—सर्वस्वी तुझाच

वसुदेव. "

* हें पद दे. भ. वामनराव जोशी ( रा. महत्त्वाकांक्षेचे कर्ते ) यांचें आहे.

वसुदेवा, काय हे या अभागिनीसाठीं तूं कष्ट घेतोस! कंसराजाच्या प्रखर राजसत्तेला शीतल चंदनाची उटी समजून जाणून बजून तिला अंगावर धारण केलेंस आणि तिच्याशीं धैर्यानें टक्कर देऊन आपलें सबंध आयुष्य या मथुरेपायीं तूं वेंचलेंस! नव्हे आपल्या सगळ्या जीविताची आहुति दिलीस. मनांत आणलें असतेंस तर कंसराजाची मर्जी संपादन करून इतरांप्रमाणें तूंही आज सन्मान्य-पदावर चढला असतास. तुझ्यासारख्या अष्टपैलु मनुष्याला जगांत काय कमी होतें? पण क्षणभंगुर अशा मानवी कृपादृष्टीचा धिक्कार करून खऱ्या कर्तव्य-निष्ठेला तूं जागलास आणि मातृभूमीच्या–या मथुरेच्या सेवेसाठीं–आपल्या तन-मनधनाला तिच्यावरून ओंवाळून टाकून आज तुरुंगामध्यें दरोडेखोरांबरोबर खडी फोडायला तयार झालास! एवढंच नाहीं, तर स्वतःच्या आत्मत्यागाचें दिव्य उदाहरण दाखवून अक्रूरासारखे निधडे आणि खंबीर मनाचे शिष्य तूं तयार केलेस. वसुदेवा, काय हें तुझें दिव्यपण! तुझ्याकडे पाहिलें म्हणजे माझ्या खडतर हालअपेष्टा मी क्षणभर पार विसरून जातें. आणि तुझ्या मूर्तीचें स्मरण होतांच कोण देहभान विसरणार नाहीं? मातृभूमीच्या कल्याणार्थ जो आपलें अमोलिक आयुष्य अर्पण करितो, त्याचेच पोवाडे जग गातें, त्याचीच जग देव्हाऱ्यांत ठेवून पूजा करितें, आणि तोच चन्द्रसूर्य असे तोंपर्यंत जगताच्या हृदयकोंदणांत अधिष्ठित असतो! तोच महात्मा खरा धन्य होय!—वसुदेवा, तुझ्या या कर्तव्यभाराच्या ओझ्यापासून ही मथुरा केव्हां मुक्त होईल? कोण येतो आहे? ( पत्र लपविते. ) मायावती का? कशाला? आणखी दुःखावर डागण्या द्यायला?

( मायावती प्रवेश करिते. )

**मायावती**—मथुरे, तूं अशी दुःखी राहूं नकोस.

**मथुरा**—दुःखी जीवानें दुःखापरतें काय करावें सांग बरें?

**मायावती**—तूं हें दुःख आपण होऊन आपल्या अंगावर ओढून घेतलेंस. विचारल्याशिवाय कशाला त्या अक्रूराच्या भेटीस गेलीस!

**मथुरा**—मुलाची भेट घ्यायलाही आईनें शेजाऱ्याची आज्ञा घ्यावी! मायावती, जबरदस्तीनें घातलेल्या बांधाचा पाट फोडून पाणी बाहेर पडल्याशिवाय राहत नाहीं! तुमच्या राजसत्तेचा जुलूम मला असह्य झाला आहे!

**मायावती**—तसें तुझ्या मनाला कां वाटावें, हेंच मला कळत नाहीं. महाराजांनीं तुला याच्यापूर्वी किती तरी स्वतंत्रतेत ठेविलें होतें. फक्त राजवाड्याच्या बाहेर पडायला तेवढी त्यांची बंदी होती. आणि ती कुणालाही असते. मला सुद्धां आहे.

**मथुरा**—मग सांग मायावती, तूं जशी आपल्या मुखत्यारीनें माझ्या भेटीला आलीस, तशीच मीही अक्रूराला भेटण्यास गेलें होतें. मग मलाच तेवढी अंधारकोठडीची ही शिक्षा कां आणि तुला कां नको? (इकडे तिकडे पाहते.)

**मायावती**—अशी कां बघतेस मथुरे?

**मथुरा**—मायावती पट्टराणीला बांधून न्यायला शिपायांची पलटण मागून येत आहे कीं काय तें पाहतें!

**मायावती**—हा दोष नाहीं असें मी ह्मणत नाहीं. पण तो नेहमींच घडेल असे थोडेंच आहे! काल चपला म्हणत होती कीं मथुरेच्या जागीं मी जर असतें तर कसलीही कुरकूर न करितां कंसमहाराजांच्या कृपाछत्राखालीं सात जन्म लोळत पडलें असतें!

**मथुरा**—तीही तुमच्याच उष्ट्या पत्रावळींवर चरलेली! मग तिचे विचारही तुमच्यासारखेच कां असूं नयेत? याच्यासाठींच अन्नाच्या मान्याखालीं मनुष्याची बुद्धि आणि मन दडपून ठेवावें लागतें. म्हणजे ऐनवेळीं आपणाला पाहिजे तसा त्या बुद्धीचा आणि मनाचा उपयोग करतां येतो.

**मायावती**—त्या दिवशीं तुझा अपमान केल्याबद्दल कंसराजांना मी किती तरी टाकून बोललें. नेहमीं नेहमीं तुझाच कैवार घेऊन बोलतें ह्मणून कंसराजे कितीदां तरी माझ्यावर रागावले आहेत. मथुरे, कांहीं जरी झालें तरी या राजसत्तेचा तुला अभिमानच वाटला पाहिजे. कारण अक्रूराची हद्दपारी रद्द होऊन वसुदेवजींनाही थोडा मोकळेपणा मिळाला आहे, ही गोष्ट तुला नाकबूल करितां येणार नाहीं.

**मथुरा**—चंचल राजाज्ञेचा विश्वास कुणीं धरावा? तिकडे अक्रूराची हद्दपारी निघाली तर इकडे सूर्यकिरणाचें दर्शनही या मथुरेला वर्ज्य झालें! कुटिल राजसत्तेची ही कुटिल लीला होय! मायावती, ही लीला तुझ्यासारखीला खरीच वाटावी, ती उमगूं नये, यातें मोठें नवल वाटतें! अथवा नवल तरी कसचें!

ज्याच्या कंठाभोंवतीं परसत्तेचा पाश घट्ट आंवळला गेला त्यालाच त्याच्या सुख-दुःखाची खरी जाणीव. राजकृपेत सुखांत लोळणाऱ्यांना त्याची काय कल्पना? मायावती, तोंडावर दोन तुकडे टाकून झुलविण्याचे दिवस आतां निघून गेले. ज्या कुत्र्यांकडून आपल्या तोंडाभोंवतीं दिवे ओवाळायचे असतील आणि त्यांच्याच भाईबंदांवर भुंकायला ज्या कुत्र्यांना सोडायचें असेल त्यांच्यापुढें हे तुकडे टाकण्याची सल्ला तूं कंसाला दे!

**मायावती**—मथुरे, तूं अशी संतप्त होऊं नकोस. मथुरा सुखी तर कंसराजेही सुखी आणि मथुरा दुःखी तर कंसराजेही दुःखी. कंसराजांचें सारें वैभव मथुरेवर अवलंबून आहे. मथुरा जर आनंदी राहिली नाहीं तर कंसराजांना तरी खऱ्या आनंदाचा लाभ कुठून मिळणार! मथुरेच्या अस्तित्वावरच कंसराजांचेंही जीवित सुरक्षित राहणार आहे. ह्मणून ह्मणतें मथुरे, तूं शांत रहा. तुझ्या शांत राहण्यानेंच कंसराजेही शांत होऊन त्या शांतीनेंच कंसराजांची भरभराट होऊन तुझेंही कोटकल्याण झाल्यावांचून राहणार नाहीं. मथुरे, पहिल्यापेक्षां मथुरेला जास्त स्वतंत्र करा अशी आज मी तुझ्याविषयीं कंसराजांजवळ रदबदली करितें. तूं घाबरूं नकोस. असले वाईट विचार आपल्या मनांतून तूं काढून टाक. असल्या विचारांनीं तूं केव्हांही सुखी होणार नाहींस. कंसराजे महा सामर्थ्यवान आहेत हें लक्षांत ठेव. मथुरे, तुझ्या सुखदुःखांकडेच कंसराजांचे डोळे लागले असतात हें तूं विसरूं नकोस. एवढ्याशा थोड्या कारणामुळें मनापासून तूं दुःखीकष्टी असणें उभयतांनाही चांगलें नाहीं. कंसराजे, तूं समजतेस त्याप्रमाणें निर्दय खास नाहींत, हें मी तुला अगदीं जीव तोडून सांगतें. तेव्हां मनांत सांठविलेलें आजपर्यंतचें सगळें दुःख याउपर तरी तूं विसरून जा. आणि हेंच समंजसपणाचें होईल. मथुरे, माझ्या ह्मणण्याचा तूं नीट विचार कर.

**मथुरा**—मायावती, हीं ओठावरचीं बोलणीं मला समजतात! या गोड गोड वरकरणी बोलण्यावर विश्वासूनच गुलामगिरीची तात मीं गळयास घट्ट आवळून घेतली! या ढोंगीपणाच्या मायाळूपणानें मथुरेचें मन आतांही वळेल अशी का तुझी कल्पना आहे? कंसाच्या मनांतून मथुरेला खरोखरच सुखी करावें अशी इच्छा असती तर, त्यानें माझे असे धिंडवडे काढलेच नसते. आणि अंतःकरणाचे शतशः तुकडे करणारें हें दुःख तूं मला विसरून जायला सांगतेस! पण

ते कसें विसरावें हें तूं स्वतः माझ्या स्थितींत आल्याशिवाय तुला सांगतां येणार नाहीं! मायावती, कंसाचें मन आज वळेल, उद्यां वळेल, असें जों जों त्याच्या तोंडाकडे आशाळभूतपणानें पहावें तों तों कंसाचा जास्त जास्त कठोरपणाच या मथुरेच्या आजवर अनुभवास आला. कंसाला या मथुरेचें मनच कळलेलें नाहीं. निरंतर मदांधपणांतच राहण्याची संवय, त्यामुळें दुसऱ्याचें अंतःकरण जाणण्याचा कोण एवढी फिकीर करितो! यायोगानें मथुरेचें कल्याण करण्याची बुद्धि जरी निर्माण झाली तरी देखील कंसाकडून याउपर तसें घडणें शक्यच नाहीं. यासाठीं ही मथुरा पुरतेपणीं स्वतंत्रच झाल्याशिवाय तिला दुसऱ्या कोणच्याही गोष्टीपासून सौख्य होणें आतां अशक्य आहे. आणि अर्थातच कंसही या मथुरेच्या स्वतंत्रतेपासून खरा खरा सुखी होऊन त्याच्या जिवाची सांप्रत चालू असलेली धरपडही अजीबाद बंद होईल. पण या मथुरेला स्वातंत्र्य देण्याला कंस जों जों मागें घेईल तों तों त्याचें मरण जवळजवळ येत आहे असें खुशाल समजावें. जो दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा अपहार करितो, त्याचेंही स्वातंत्र्य परमेश्वर फार वेळ टिकूं देत नाहीं. म्हणून म्हणतें, मायावती, कंस जर अजूनही शुद्धीवर येणार नाहीं किंवा तूं त्याची बायको त्याला वेळेवर शुद्धीवर आणणार नाहींस, तर त्याच्या पापाचा घडा संपूर्ण भरल्यावर कंसाचा एवढा मोठा हा पोकळ डोलारा एकदम ढासळून जाऊन जमीनदोस्त झाल्यावांचून राहाणार हे नाहीं पक्कें समज! [ पडदा पडतो. ]

---

## प्रवेश ४ था.

( कांहीं **गोपाळ** प्रवेश करितात. )

**गोपाळ**—चला रे, वेळ पहा किती झाली? श्रीकृष्ण रागवेल ना आपणांवर! नेहमीं नेहमीं असा उशीर होणें बरें नाहीं.

[ अक्रूर प्रवेश करितो. ]

**अक्रूर**—मुलांनो, तुम्ही श्रीकृष्णाकडे चाललांत काय? मला घेऊन चलतां? मलाही श्रीकृष्णाची भेट घ्यायची आहे.

**गोपाळ**—हो हो, चला आमच्याबरोबर. श्रीकृष्ण आतां यमुनेच्या तीरावर आहे. या असे आमच्या मागोमाग.

पद [ मी नव बाला० या चालीवर. ]

यमुनातीरीं चला जाऊं ॥ ध्रु० ॥

काळि कांबळी पांघरलेली

तो वनमाली । चला पाहूं ॥ १ ॥

पीत वसन कटि कालिंदी-तटिं

विहरत नट तो । चला पाहूं ॥ २ ॥

धेनु सकौतुक देखिति यन्मुख ।

यदुनायक तो । चला पाहूं ॥ ३ ॥

विश्वबांसरी खेळवि अधरीं ।

असा मुरारी । चला पाहूं ॥ ४ ॥

पंकजलोचन विधुसम आनन ।

मनमोहन तो । चला पाहूं ॥ ५ ॥

मधुवनमाला धारि कंठाला ।

व्रजप्रियाला । चला पाहूं ॥ ६ ॥

दावुनि लीला तोषवि सकलां ।

त्या गोपाला । चला पाहूं ॥ ७ ॥

चिद्ब्रह्माचो पूर्णांशाची ।

मूर्ति हरीची । चला पाहुं ॥ ८ ॥

यमुनातीरीं चला जाऊं ॥ ध्रु० ॥

( यमुनेच्या वाळवंटांत कांहीं मुलें कुस्त्या खेळत आहेत; कांहीं जोर-बैठका काढीत आहेत; कांहीं दांडपट्टा खेळत आहेत आणि कांहीं पोहत असून श्रीकृष्ण या सर्वांवर देखरेख करीत आहे असा देखावा पडदा वर गेल्यावर दिसतो. )

**श्रीकृष्ण**—( एका मोठ्या मुलाचा हात धरून ) याच्याशीं कुस्ती खेळायला कोणी तयार आहे?

**एक लहान गोपाळ**—( पुढें येऊन ) मी आहें !

**श्रीकृष्ण**-तुझी याची बरोबर जोडी नसतांनाही याच्याबरोबर कुस्ती लढण्याची तुझी ईर्षा पाहून मोठें कौतुक वाटतें ! बरें तर, मोठ्याशीं दोन हात करण्याचा केव्हां तरी मनुष्यावर आयुष्यांत प्रसंग येतोच, त्या वेळीं तूं कच खाणार नाहींस

ही माझी खात्री आहे. सध्यां (एका लहान मुलाचा हात धरून) याच्याशीं खेळ.

[ दोघांची कुस्ती चालू होते, इतक्यांत अक्रूर प्रवेश करितो. ]

**अक्रूर**—श्रीकृष्णा, हा खेळ तूं आणखी असा किती दिवस खेळणार आहेस ?

**श्रीकृष्ण**—अक्रूरा, हीं लहान मुलें ह्मणजे स्वातंत्र्यमंदिराचा पाया होय. तो चांगला भरभक्कम तयार झाल्याशिवाय स्वातंत्र्याचें मंदिर विनधोकपणें उभारतां येत नाहीं.

**अक्रूर**—पण तें स्वातंत्र्यमंदिर पारतंत्र्याच्या कर्दमांत सपशेल बुडून जाऊन दृष्टीआड झाल्यावर या भक्कम पायाचा मग कितीसा उपयोग होणार आहे ?

**श्रीकृष्ण**—स्वातंत्र्याचें मंदिर सर्वथैव नामशेष झाल्यावर- नजरेच्या टापूबाहेर तें गेल्यावरच स्वातंत्र्याची तीव्र लालसा मनुष्याच्या ठिकाणीं उत्पन्न होते. तो लालसेचा तीव्रपणाच पुढें नवीन मंदिराची उभारणी करण्याला मनुष्याला भाग पाडतो. अशा वेळीं ह्या भक्कम पायावरच त्या स्वातंत्र्यमंदिराची टोलेजंग इमारत उभारावी लागते. म्हणून ती इमारत बांधण्याच्या अगोदर हा पायाच मजबूत करण्याचे श्रम घेणें अवश्य आहे. आणि तसे श्रम घेतले नाहींत तर इमारत उठविण्याचा कितीही हव्यास धेतला तरीसुद्धां ती मनाजोगती उठणें अशक्य होतें यदाकदाचित् उठलीच, तर ती केव्हां कोसळून पडेल याचा नेम राहत नाहीं. तसेंच स्वातंत्र्यमंदिराचे आधारस्तंभ हीं मुलेंच होत. तीं जितकीं बळकट, धैर्यशाली आणि दृढनिश्चयी निपजतील, तितकें तें मंदिर जास्त लवकर उभारलें जाईल. मथुरेचा अक्रूर धैर्यशाली आणि दृढनिश्चयी नसता तर स्वातंत्र्याचें मंदिर उभारण्यासाठीं श्रीकृष्णापर्यंत येऊंच शकला नसता.

**अक्रूर**—श्रीकृष्णा, या कंसगरुडाचे अघासुरासारखे प्रबल पंख तूं उपटून टाकलेस खरे, पण विपंख झालेला तो गरुडच मथुरेला सध्यां इतका भारी झाला आहे कीं, त्याच्या एकट्याच्या जुलुमापुढेंच बिचारी मथुरा गतप्राण होण्याची वेळ आली आहे ! कंसवधाशिवाय आतां गत्यंतर नाहीं. कंसवध झाल्याविना मथुरा मुक्त होणार नाहीं. आणि तो कंसवध करण्याला श्रीकृष्णा, तुझ्यावांचून बाकी सारे असमर्थ आहेत !

**एक गोपाळ**—अक्रूरा, तूं आमच्या श्रीकृष्णाला येथून नेऊं नकोस. तुला कंसवध पाहिजे ना ? मला घेऊन चल. या काठीचा टोला त्या कंसाच्या डोक्या

वर असा लगावतो कीं, एका टोल्यानेच त्याचा वध होऊन जाईल !

**दुसरा गोपाळ**—अक्रूरा, आमच्यापासून आमच्या श्रीकृष्णाला तूं नेऊं नकोस. तूं मला घेऊन जा. एका कलाजंगाच्या पेंचानें तुमच्या कंसाला असा चीत करितों कीं एकदम त्याचा वधच व्हावा !

**तिसरा गोपाळ**—अक्रूरा, तूं बाकी पाहिजे तें कर, पाहिजे तें ने, पण या श्रीकृष्णाला आमच्यामधून नेऊं नकोस ! श्रीकृष्ण आमचा आहे. तुला कंसवधाचीच तेवढी काळजी असेल तर मला बरोबर ने. म्हणजे या तलवारीच्या एका वारानें त्या कंसाचें डोकें आकाशांत उडवून देऊन यमुनेच्या पाण्यांत फेंकून देतों !

**चौथा गोपाळ**—अक्रूरा, तूं आमचा खेळगडी आमच्यांतून नेऊं नकोस ! श्रीकृष्ण आमचा प्राण आहे. तूं जर श्रीकृष्णाला न्यायचा हट्टच धरशील तर मग तुम्हां दोघांनाही आम्ही जाऊं देणार नाहीं. आम्ही असे रस्त्यांत आडवे पडून राहूं !

( मुलें रस्त्यावर आडवीं पडतात. )

**अक्रूर**—श्रीकृष्णा, काय हें या लहान लहान गोपाळांचें तुझ्यावर प्रेम आणि भक्ति ! या भक्तिप्रेमाच्या साम्राज्याच्या तूं मुकुटमणी आहेस. आणि तो मणी जर मुकुटांतून एखादा कोणी निष्ठुरपणानें काढून घेऊं लागला तर त्याचा संताप कां येऊं नये ? ( गाई आडव्या येतात. ) ह्या पहा, दूर असलेल्या गाईसुद्धां तूं जाऊं नयेस म्हणून रस्त्यावर आडव्या झाल्या आहेत ! मुक्या जिवांची देखील तुझ्यावर तितकीच उच्चकोटीची असलेली भक्ति आणि प्रेम तूं माझ्या प्रत्ययाला आणून दिलेंस. मुक्या आणि बोलक्या जीवांच्या खऱ्या प्रेमाचा धनी श्रीकृष्णा, आज जगांत फक्त तूं आहेस ! धन्य तूं !—श्रीकृष्णा, अशा या बोलक्या-मुक्या जीवांचा हिरमोड करून ' मथुरेला चल ' असें मी तुला कोणत्या तोंडानें म्हणूं ? ( मुलें उठतात आणि गाई बाजूस होतात. ) पहा, इतकें मी म्हटलें मात्र— मुलें उठलीं आणि गाई बाजूला झाल्या ! या भक्तिप्रेमाच्या भोंवऱ्यांतून तुला ओढून नेण्याची श्रीकृष्णा, माझ्यांत शक्ति नाहीं ! तें मी सर्वस्वी तुझ्यावरच सोंपवितों.

**श्रीकृष्ण**—पण अक्रूरा, राधेच्या अज्ञेवांचून तुझ्याबरोबर मथुरेस मला येतां केव्हांही येणार नाहीं.

*

**अक्रूर**—पण श्रीकृष्णा, या प्रेमाला कवटाळून दीन दुबळयांना साह्य करण्याच्या व्रतापासून तूं च्युत होऊं नकोस-तूं अच्युत आहेस. आह्मी तुला शरण आलों आहोंत. साऱ्या मथुरेचे डोळे तुझ्या आगमनाकडे लागलेले आहेत. तुझ्या आगमनाशिवाय मथुराजनांना दुसरें कांहींही सुचत नाहीं. मथुरेंतील लोकांच्या मनाचा इतका दृढ निश्चय झाला आहे कीं, तूं सांगशील त्याप्रमाणें वागण्याची त्यांची पूर्ण तयारी आहे. त्यांना आज फक्त तुझ्यासारखा बलवान आणि बुद्धिसामर्थ्याचा नेता पाहिजे आहे. श्रीकृष्णावांचून कंसवध होणें नाहीं असें वसुदेवजींचेंही ह्मणणें आहे. तेव्हा श्रीकृष्णा, त्यांची अशी निराशा करूं नकोस!

**श्रीकृष्ण**—पण प्रेमाची स्फूर्ति असल्यावांचून मनुष्याच्या हातून पडावें तसें कर्तव्य पार पडत नाहीं. त्या प्रेमस्फूर्तीच्या ओलाव्यानेंच कर्तव्यवृक्षाला पाहिजे तीं मधुर फळें आलेलीं दृष्टीस येतात!

**अक्रूर**—राधेचें तुझ्यावरलें प्रेम इतकें दृढ आहे कीं, त्याचा भंग करणें वज्रासही कठीण आहे! अशा त्या उच्चतम दृढ प्रेमाचा श्रीकृष्णा, धनी तूं! तेव्हां त्या दृढ प्रेमाला पाझर फोडण्यास तुझ्याशिवाय दुसरा कोण शक्तिमान आहे?

[ श्रीकृष्णास वंदन करितो. पडदा पडतो. ]

---

## प्रवेश ५ वा

### [कंस आणि मायावती]

**कंस**—मायावती, माझ्यापासून आतां तूं केव्हांही दूर होऊं नकोस. तूं जवळ असलीस ह्मणजे माझ्या मनाला तितका विसांवा मिळतो.

**मायावती**—आपण होऊन महाराजांनीं हा आपल्यास त्रास करून घेतला आहे. जरासंध, शिशुपाल हे महाराजांचेच जिवलग स्नेही. पण ते कसे सुखी आणि आनंदी असतात! मग महाराजांनीं तरी तसें कां असूं नये?

**कंस**--मायावती, हा तुझा कंस दुसऱ्या कशालाही भीत नाहीं. पण एका मृत्यूचें मात्र त्याला अतिशय भय वाटतें. केव्हां तरी लवकरच एखादे दिवशीं या मृत्यूमुळें या मथुरेचें अनुपम वैभव या कंसाला सोडावें लागणार, या कल्पनेनें मी कसा भेडावून गेलों आहें. मायावती, इतक्यांतच माझी मरण्याला तयारी नाहीं!

**मायावती**—मरण जगाला असतें. पण ह्मणूं तेव्हां तें येत कां असतें? पण

हें भय महाराजांना आज कुणामुळें एवढें वाटतें ? एवढें बलवान चतुरंगसेनेचें पाठबळ महाराजांजवळ सदैव जागरूक असतां उगीच कशाला कुणास भ्यावें ?

**कंस**—मी तुला आतांच सांगितलें ना कीं जगांत कुणालाही मी भीत नाहीं ह्मणून ? उलट जगच या कंसाला त्याचें अफाट सामर्थ्य पाहून चळचळ कांपतें. डोळा नुसता वर उचलायचाच अवकाश, जगांतलीं सारीं मी मी ह्मणणारीं चिलटें या कंसाच्या पायाशीं घोंटाळत लोळत पडतात ! आजपर्यंतच्या चिलटांचा तोंडासमोरच तेवढें गायन करण्याचा प्रघात होता. पण हा क्रम या कंसानें पार बदलून टाकून त्यांना माझ्या पायांभोवतीं घिरट्या घालायला लाविलें आहे ! मला गिवत्रिण्याची आजच्या जगांत या घटकेला कोणाच्या अंगांत एवढी शक्ति आहे ? पण मायावती, हा घरांतला मथुरेचा साप कोण्या वेळीं माझ्या पायाला दंश करून माझा प्राण घेईल याचा नेम नाहीं !

**मायावती**—पण या सापाचे विषारी दांत पाडण्याचें महाराजांमध्यें चातुर्य असतां त्याची फिकीर करण्याचें महाराजांना मुळींच कारण नाहीं. सापाला दंतविहीन केव्हांच करितां येईल. मथुरा महाराजांवर असावी तशी राजी नाहीं. महाराजांचा पाडाव करण्यासाठीं विरुद्ध दिशेनें तिची जारीनें खटपट चालू आहे हें खोटें नाहीं. आजपर्यंतचें महाराजांचें स्वरूप वसुदेवादिकांना बंदींत टाकून भर दोन प्रहरच्या सूर्यासारखें प्रखर–उग्र असें मथुरेच्या अनुभवास आलें. पण यापुढें दुधासारख्या पांढऱ्या पाण्याचा पेला मथुरेपुढें करून पौर्णिमेच्या शीतल चंद्राप्रमाणें तिच्यावर मोहजालाचें आवरण घालून मथुरेला पुन्हां महाराजांना आपल्याताब्यांत घेतां येईल.

**कंस**—मथुरेच्या लोकांना पहिल्यासारखें शुष्क मानाच्या नादीं लावून त्यांच्यामध्यें भेद उत्पन्न करणेंही आतां मोठें दुरापास्त झालें आहे.—पण मायावती, आजपर्यंत या कंसानें मथुरेला कोणत्या गोष्टींत कमी केलें ?

**मायावती**—तसेंच आतांही पहिल्यापेक्षां जास्त मोकळेपणाचें थोडें अधिक स्वातंत्र्य मथुरेला बहाल करावें, अशी महाराजांच्या पायांजवळ या मायावतीची प्रार्थना आहे.

**कंस**—काय मायावती, मथुरेला आणखी जास्त स्वातंत्र्य देऊं म्हणतेस ? मग या सगळ्या जगाची थुंकी या कंसराजाच्या तोंडावर येऊन पडेल त्याची

काय वाट? शिशुपाल—जरासंधासारखे माझे प्रतापशाली स्नेही यःकश्चित् मथुरेसारख्या अबलेच्या वडबडीला भ्यालास म्हणून माझा धिक्कार करतील, तो मी कसा ऐकून घेऊं? जे जे चिमुरडे राजे या पायानें ठेंचून टाकले, ते ते सारे या घरांतल्या ताटाखालच्या मांजरीपुढें या कंसाचें मन दुबळें—भेंकड झालेलें पाहून या नामर्द कंसाच्या तोंडाकडे वर मान करून हंसतील, तें मी डोळ्यांनीं कसें पाहूं? भीषण गर्जना करून सगळ्या जगाला घाबरवून सोडणारा हा सिंह गरीब गाईसमोर नमला हा अपशब्दांचा मारा मी कसा सहन करूं? साऱ्या ब्रम्हांडाला थरकांप आणणारा या कंसाचा दरारा या दीडदमडीच्या बायकोनें कवडीमोल ठरविला हा काळा डाग माझ्या शूरपणास मी कसा लावून घेऊं? प्रत्यक्ष परमेश्वराचेंही सिंहासन डळमळविणारी, आणि जो आपल्या कुजक्या शक्तीची वायफळ घमेंड मारतो त्यालाही अंधेऱ्या रात्रीं मथुरेंतून गुपचूप पळ काढायला लावणारी कंसाची जी एवढी प्रचंड शक्ति ती निव्वळ पोकळ, दिखाऊ आहे असें तुला वाटतें कीं काय? नाहीं! मायावती, नाहीं! हा मानी कंस आजपर्यंत कोणापुढेंही वांकला नाहीं. माझ्या वीरवृत्तीला आणि शूर कीर्तीला ज्यायोगानें कमीपणा येईल अशी गोष्ट या कंसाकडून कालत्रयीं होणार नाहीं! माझें अंतःकरण दयाशील ह्मणूनच या बटकीच्या अशा गमजा चालतात! मनांत आणीन त्या दिवशीं, त्या घटकेला या मथुरेचा असा एका लाथेनें चुराडा उडवीन!

**मायावती**—पण पेल्यांतलें पाणी दुधानेंच पांढरें झालें पाहिजे असा कुणाचा आग्रह आहे? मथुरेच्या डोळ्यांना तो पेला दुधाचा वाटला ह्मणजे झालें! मग तो पांढरेपणा कशानेंही येवो! महाराजांच्या या औदार्यामुळें जगाच्या डोळ्यांवर धूळ पडून ते दिपून जातील. मग या मथुरेचा वाटेल तसा जरी समाचार घेतला तरी महाराजांच्या कनवाळू अंतःकरणाविषयीं कुणाला यत्किंचित देखील शंका येणार नाहीं. उलट कमीजास्त कांहीं घडून आल्यास जगाच्या सहानुभूतीचा ओढा महाराजांकडेच आपोआप धांवून येईल.

[ गुप्त हेर प्रवेश करितो. ]

**गुप्त हेर**—मथुराधिपतीचा जयजयकार असो! महाराज, श्रीकृष्णास मथुरेस आणण्याकरितां अक्रूर गोकुळास जाऊन पोहोंचला आहे!

**कंस**—पाहिलेंस मायावती, अक्रूराची हद्दपारी काढून घेतल्याबरोबर त्यानें

आपले गुण उधळले. या लोकांवर थोडी जरी दया दाखविली, तरीसुद्धां ते त्याचा फायदा घेऊन लगेच डोक्यावर नाचायला तयार होतात! आतां दया नाहीं, कांहीं नाहीं! आजपासून कंसानें दयेशीं फारकत केली आहे! कंसाचें अंतःकरण या घटकेपासून मथुरेविषयीं आतां पुरें पुरें निर्दय झालें आहे! (गुप्त हेरास) काय म्हणतोस, तो काळतोंड्या मथुरेस येणार? (हेराची मानगुटी धरण्यास जातो, तोंच त्याला श्रीकृष्णाची छाया दिसते. तो दचकून मागें वळतो.) काय, तो येणार? (असें ह्मणून मायावतीच्या खांद्यावर हात टाकायला जातो. पुन्हां त्याला श्रीकृष्णाची छाया दिसते. तो दचकून मागें होतो.) पण तो तर येथें येऊन चुकला आहे! तो–तो–तो (धरायला जातो) पळ, मागें पळ! काळतोंड्या, तूं असाच मागें पळ! या शूर कंसाची तुला भीति वाटलीच पाहिजे. हा आहे येथें. मायावती, त्या काळतोंड्यास धर ग! दे माझ्या हातीं --तो--तो--तो तिथें आहे. आण, त्याला माझ्याजवळ आण--तो पहा तुझ्याजवळ उभा आहे--धर त्या काळतोंड्याचा हात--तूंच त्याची मुंडी मुरगळून टाक. तो--तो तुझ्यापुढें आहे. सोडूं नको. या काळतोंड्याला तूं भितेस? त्याची गय करतेस?--माझ्यापेक्षां --या कंसापेक्षां--पण कंस तुझा नवरा--आणि तो तुला मोठा वाटतो? ते पहा त्याचे डोळे मजकडे कसे अगदीं टवकारून पहात आहेत! त्यांतल्या विस्तवाच्या ठिणग्यांनीं माझ्या सर्वांगाला कशी आग लागली ग! फोड ते त्याचे डोळे! नाहीं तूं फोडीत? हें पहा मीच त्याला आपल्या लाथेनें ठेचून टाकतों. (असें म्हणून एका खांबाला तो मोठ्या जोरानें लाथ मारतो. खांबाचा चुराडा होतो.) --तो पहा--मला पाहून पळतो आहे--मीच त्याच्या मागोमाग जाऊन त्याला ठार मारतों!

[ पळत जातो. ]

**मायावती**—हाय रे दैवा! ते पहा महाराज पाण्याच्या हौदांत पडले! मथुरे, तुझा सत्यनाश होईल!

[ जाते. ]

## प्रवेश ६ वा.

( कांहीं गोपी खालील गाणें आळीपाळीनें म्हणत ह्मणत प्रवेश करितात )

( अजि अक्रुर हा० या चालीवर )

अजि अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला
काळ सखे कोठुनि आला ॥ ध्रु० ॥
कशि नाहिं दया माया तद्हृदयाला
आचरितो खलमार्गाला
ब्रजिं स्वप्निं कधीं चिंतिलें न अहिताला
कां असा रुष्ट मग झाला
'अक्रूर' नामि जन वदतो
क्रूरता दावि कां मग तो
हा बोध मुळीं नच होतो
अपराध कसा नसतां तरी मनुजाला
चढवावें कां फासाला ॥ १ ॥

जो वंद्य अम्हां सकलांहुनि या जगतीं
तोचि कां पूज्य त्या चित्तीं
जो गोकुळिचा प्यारा प्राण जिवाचा
तोचि कां तया प्रिय साचा
जगिं थोर कुणी ज्याहुनि आम्हां नाहीं
तोचि कां श्रेष्ठ त्या राही
तरि सांग एक मज सजणी
रुचि भिन्न जगाची ह्मणुनी
वदताती मोठे ज्ञानी
मग उभयांच्या कसा वसे हरि हृदयीं
अपवाद कसा हा होई ॥ २ ॥

ब्रजिं मधुमासें कोणास्तव राहावें
हरिविना कुणि न ज्या ठावें

मग कोकिलगण कुणास गाइल गाणीं
हरिविणें न कुणि ज्या ध्यानीं
मग आम्रतरू देतिल कवणा शांति
हरिविण न कुणा जे बघती
जो बघे प्रथम हरिमूर्ति
तो सूर्य कुणाच्यासाठीं
मग येइ उदयगिरिवरती
जगतीं न कुठें तें या हरिच्या पायीं
रत होई गोकुळठायीं ॥ ३ ॥

स्थिति कुंजाची होय कशी यापुढतीं
जो घेइ जन्म हरिसाठीं
वद कोण करी समाधान यमुनेचें
जिस वेड एक कृष्णाचें
स्थल मकरंदा कुठें अतां स्थिर व्हाया
हरिपायिं वाहि जो काया
कोठलें फुलांचें हंसणें
जलतरंग कुठले दिसणें
कोठला गंध दरवळणें
हरि गोकुळिचा चैतन्याचा ठेवा
जीवाचा प्राणविसावा ॥ ४ ॥

ते झोपाळे ठायिंठायिंचे आतां
दिसतील वायुशीं हलतां
तीं इवलालीं बाळें हा गाईंचीं
पोरकीं राहतिल साचीं
बघतां न हरी छत्रीखालीं अपुल्या
गाळील मेघ अश्रूंला

व्रजगोपींच्या रमणांचा
तो रागहि ओठावरचा
ये लोचनिं आतां कुठचा
स्थल नव्हतें ज्या तदंतरीं केव्हांही
स्थिति काय तयाची होई ॥ ५ ॥

ये कुठला तो वेणुनाद या श्रवणा
जो फुलवि चित्तकुसुमांना
त्या कुठल्या ग ! बालगोप मधुलीला
ज्या नेती वैकुंठाला
तें इंवरणें कुठलें ह्या सुरभींचें
जें मूर्त चित्र भक्तांचें
अम्हि ललना व्रजनभिं तारा
हरि चंद्र त्यांत रमणारा
ती जोत्स्ना राधा रुचिरा—
पण आतां हें सकल स्वप्न ठरणारें
नुसतेंच स्मरण उरणारें ॥ ६ ॥

हृदयांत असा कसला भाव धरोनी
खलचित्त येइ ह्या स्थानीं
त्या वाटे का मानसिं ह्या गोकुळिंचें
हरिवरती प्रेम फुकाचें
त्या वाटे का हळु हळुं हरिविरहांत
विसरेल पुढतिं गोकुळ तें
तें वृथा प्रेम कसलें ग !
हरिविसर कसा असतो ग !
व्रजकोशिं बोल हे कां ग !
त्या कळेल तइं हरिस जाय घेवोनी
गोकुळच्या प्रेतावरुनी ॥ ७ ॥

ह्या स्वर्गाचें रान करी हा बाई
दुर्बुद्धि कशी त्या होई
आनंदनिधी लुटुनि व्रजाचा नेई
कशि तयास लज्जा नाहीं
ह्या गोकुळिचा प्राण हिरावुनि, धेई
कोणचें पुण्य तो पाही
वाढविण्या विभव स्वतांचें
जो हरी विभव दुसऱ्यांचें
तुडवुनी नियम सृष्टीचे
तो परमेश्वर सौख्यभोग त्याचाही
त्या क्षणींच हरुनी नेई !

[ जातात. ]

---

## प्रवेश ७ वा.

[ श्रीकृष्ण आणि राधा ]

**श्रीकृष्ण**—पुरे झालेत हे झोके ! राधे, या कुंजवनाची शोभा आज अपूर्व दिसत आहे. राधे, अशी कोणची अजब जादू तूं येथें पसरविलीस कीं या कुंजवनांत आल्यावर आपण येथें आज नव्यानेंच येत आहों असें मला प्रत्यहीं वाटावें !

**राधा**—श्रीकृष्णा, ही अजब जादू राधेची नव्हे, तर श्रीकृष्णाची ही अलौकिक मोहिनी होय ! ह्या तुझ्या मोहिनीचा प्रभावच असा आहे कीं, राधेसारख्या सजीव जीवाला मुग्ध करून वृक्षलतांसारख्या जडजीवांना बोलकें करायचें !

**श्रीकृष्ण**—जिकडे पहावें तिकडे या कुंजवनांत सगळा आनंदच आनंद भरून गेलेला दृष्टीस येतो ! हें आनंदाचें साम्राज्य पसरायला आज कोणची अशी महापर्वणी आहे राधे ?

**राधा**—तुझ्या दर्शनाशिवाय दुसरी कसली महापर्वणी असणार ? श्रीकृष्णाचें दर्शन हीच महापर्वणी ! श्रीकृष्णा, श्रीकृष्णाच्या संगतीचा राधेनेंच आनंद कां लुटावा, आह्मींही कां भोगूं नये, ह्मणून तूं इथें पाऊल टाकल्याबरोबर या जडजीवांच्या त्या आनंदी भावनेचा हा आनंदी वरवडपगा तुझ्या अनुभवास

आला आहे. पहा, उमललो नाहीं अशी एकही कळी आज या कुंजवनांत तुला सांपडणार नाहीं !

**श्रीकृष्ण**—न उमलणाऱ्या तेवढ्या सगळ्या कळ्या तुझ्या ओठांच्या पडद्यामागें लपून बसल्या आहेत. राधे, तुझें मधुर हास्य या फुलांनीं चोरून घेतलें असून तूं उलट त्यांचें कौतुकच करतेस ! यावरून या जडजीवांनीं आपल्या आनंदी वृत्तीचा प्रभाव तुझ्या स्त्रीजातीच्या स्वभावावर चालवून त्या मत्सराला आनंदाच्या अमृतजलांत विरघळवून त्यालाही मूर्तिमंत आनंदाचाच पोषाख चढविला ह्मणायचा !

**राधा**—श्रीकृष्णा, या फुलांनीं आज माझें अनुकरण केलें नसून तुझ्या पुरुषजातीच्या वृक्षांनीं माझें अनुकरण केलें आहे. तुह्मां पुरुषांना स्त्रीजातीचें अनुकरण करायला मोठी लज्जा वाटत असते. पण या आनंदाच्या पर्वणींत आपला जातिविशेष हे वृक्ष पार विसरून गेले आहेत. श्रीकृष्णा, हीं आनंदी फुलें तुझ्यासारखीं गोड हसत असून त्या हास्याला भुलून जाऊन देहभानरहित झालेले हे वृक्ष राधेसारखे डुलत आहेत.

**श्रीकृष्ण**—हें कारंजांतलें पाणी आजच इतकें शांत कां ? यालाच कशाचा एवढा राग आला ? या आनंदाच्या वातावरणांत धुंद होऊन आनंदाच्या लहरींवर लहरी उसळायला पाहिजे होत्या राधे, या पाण्यानेंच तेवढें दुःखी कां रहावें ? मला वाटतें, तुझ्या डोळ्यांनीं या पाण्यांतल्या सत्वाची चोरी केल्यामुळें त्याचा त्याला संताप येऊन ती चोरी मजजवळ सांगायचा या जलाचा मानस होता. पण तूंच जवळ असल्यानें तुझ्या या पाणीदार डोळ्यांनीं आपला चोरटेपणा उघडकीस येऊं नये ह्मणून त्या गरीब बिचाऱ्याला चूप बसविलें. इतकेंच नव्हे तर हे तुझे जुलमी डोळे या पाण्याच्या हृदयांत ठाणें देऊन बसले आहेत. त्याच रागानें आणि दुःखानें हें पाणी शांत असावें !

**राधा**-तसें नव्हे. आपला नीलरंग आपल्यापासून उसना घेऊन श्रीकृष्णानें धारण केला, या धन्यतेच्या आनंदांत मग्न होऊन हें पाणी आपल्या ठिकाणीं इतकें शांत आहे. आनंदाच्या तल्लीनतेंत चंचल वृत्तीचा चंचलपणा जर गेला नाहीं तर तो मुळीं आनंदच कसचा ?

**श्रीकृष्ण**--राधे, पहा, सांभाळ! ( इतक्यांत राधेचा कारंजांत झोंक जातो. श्रीकृष्ण आपल्या हातानें तिला सांवरतो. ) राधे, या आनंदाच्या भरांत डोळ्या-बरोबर तुझें शरीरदेखील त्या पाण्याच्या हृदयांत जाऊन वसणार होतें वाटतें! पण पाण्यांतला नीलपणा श्रीकृष्णानें उसना घेतल्यावर राहिलेल्या शुभ्रपणांत हा तुझा शुभ्र देह एकरूप होऊन गेला असता. मग आपल्या राधेला श्रीकृष्णानें कोठें शोधलें असतें?

**राधा**—श्रीकृष्णा, आनंदाची आज परमावधि झाली! कुंजवनांतलें रमणीय सौंदर्य कळसास गेलें! आणि राधाकृष्णांच्या संगमाचें सौख्य परिसीमेस जाऊन पोहोंचलें! श्रीकृष्णा, आजच्यासारखा या कुंजवनांतला स्वर्गीयपणा पुन्हां आपल्या अनुभवाला येणार नाहीं असें मला वाटतें. हीच शेवटची घडी! श्रीकृष्णा, या आपल्या राधेला सोडून कुंजवनांतून आज तूं कुठें जाऊं नकोस.

**श्रीकृष्ण**—आपल्या राधेची आज मी आज्ञा मागायला आलों आहें.

**राधा**—कशाकरितां?

**श्रीकृष्ण**—मथुरेला जाण्यास.

**राधा**—मथुरेस तूं जाऊं नकोस.

**श्रीकृष्ण**—कां बरें?

**राधा**--तुझें जाणें फायदेशीर होणार नाहीं.

**श्रीकृष्ण**—फायदा किंवा तोटा याविषयीं आतांच कसें सांगतां येईल? तेथें जाणें फक्त आपलें काम आहे.

**राधा**—पण तूं मथुरेला आधीं जाणारच कशासाठीं?

**श्रीकृष्ण**—अनाथ मथुरेला साह्य करून तिला कंसाच्या जाचांतून मुक्त करण्यासाठीं.

**राधा**—काय, मथुरा अनाथ आहे?

**श्रीकृष्ण**—होय. मथुरा अगदीं असहाय स्थितींत पडली आहे.

**राधा**—तर मग तूं मुळींच जातां कामा नयेस!

**श्रीकृष्ण**—दीन दुबळ्यांना साह्य करावें असें राधेचेंच सांगणें आहे ना?

**राधा**—आणि अजूनही मी तसेंच म्हणतें कीं, शक्तिमान पुरुषांनीं अना-थांचें रक्षण करणें हें त्यांचें आद्य कर्तव्य होय.

**श्रीकृष्ण**—मग श्रीकृष्णाला कर्तव्यापासून भ्रष्ट करण्यांत राधेचा कोणता हेतु असावा ?

**राधा**—श्रीकृष्णाच्या मथुरेला जाण्यांत कर्तव्यबुद्धीचें अतिक्रमण होतें आहे. बलवंतांनीं बलहीनांना साह्य करून त्यांच्या ठिकाणीं नसलेल्या शक्तीची पूर्णता करणें हें जितकें इष्ट आहे, तितकेंच अनिष्टही आहे.

**श्रीकृष्ण**—मथुरेला कंसाच्या दास्यामधून स्वतंत्र करणें हें अनिष्ट आहे असें कां तुझें म्हणणें आहे ?

**राधा**—होय.

**श्रीकृष्ण**—मग अशा दीन स्थितींत मथुरेनें काय करावें असें तुला वाटतें ? दुर्बलांचे अश्रु जर शक्तिवंतांनीं पुसले नाहीत तर मग त्यांचा वाली तरी जगांत कोण उरला आहे ? अशा खडतर अवस्थेंत त्यांचा निभाव लागावा तरी कसा ?

**राधा**—मरून जावें ! असे परके वाली न् बिली शोधीत बसण्याचे श्रम घेण्यापेक्षां मरून जाणें हेंच दुर्बलांच्या पुष्कळ पटीनें हिताचें आहे. त्यांत एकदांचा सोक्षमोक्ष तरी होतो. अहोरात्र ओरडल्यानें जगाच्या कानठाळ्या बसविण्याचें पाप चुकतें आणि जगाला शांतिलाभ मिळवून देण्याचें पुण्य पदरांत पडतें.

**श्रीकृष्ण**—पण त्यांच्यांत कमी असलेल्या चैतन्यशक्तीची भर घालून जर त्यांना वैभवाच्या उच्च शिखरावर नेऊन बसविलें तर त्यांत शक्तिवंतांच्या शक्तीचा योग्य उपयोग झाल्यासारखें नाहीं का होणार ?

**राधा**—नाहीं. मारून मुटकून नेऊन बसविलेल्या ठिकाणीं दुर्बल कायमचे स्थिर होत नाहींत. दुसऱ्याच क्षणीं त्या वैभवशिखरावरून गडगडत खालीं येऊन पहिल्यापेक्षांही ते जास्त शक्तिहीन होतात. उसन्या शक्तीच्या साहाय्यानें स्वर्ग प्राप्त करून घेण्यापेक्षां दैन्याच्या नरकांतच कुजत राहिलेलें काय वाईट ? ह्मणून ह्मणतें, श्रीकृष्णा ! मथुरेला साह्य करून तूं पापाचा धनी होऊं नकोस !

**श्रीकृष्ण**—तो कसा ?

**राधा**—दुर्बल मथुरेला तूं आपली अमोघ शक्ति खर्च करून कंसाच्या पाशांतून सोडविलेंस, ह्मणजे आपणांला संकटमुक्त करणारा जगांत कुणी तरी वाली आहे या दृढ कल्पनेनें ती स्वतः शक्तिमान होण्याविषयीं आतांपेक्षांही बेफिकीर होऊन तशीच चैनींत लोळत पडेल. आणि उत्तरोत्तर पहिल्यापेक्षांही जास्त

निःसत्व आणि निर्बल होईल. हा तिचा निर्बलपणा दुसऱ्या कुण्या शत्रूच्या ताबडतोब नजरेस येऊन तो पुन्हां या मथुरेवर आपला जुलमी अंमल चालविल्याशिवाय राहणार नाहीं. कारण दुर्बलांच्या ओरडण्याकडे मुळींच लक्ष न देतां झडप घालून त्यांस कुणीही खाऊन टाकावें, हा जगाचा नियमच आहे. यासाठीं मी तुला सांगतें, या दुर्बल स्थितींत मथुरेला साह्य करून तिचा दुर्बलपणा आणखी जास्त वाढविण्याचें पाप जाणून बुजून तूं आपल्या माथीं घेऊं नये. तिला अशाच हालअपेष्टांत आणखी कांहीं काळ काढूं दे. आतां निदान संकटांची आंच सोसण्याइतकी तिच्यांत शक्ति तरी आहे. आपल्या साह्याला आतां दुसरा कुणीही जगांत धांवून येत नाहीं, अशी तिची पुरी खात्री झाल्याशिवाय ती स्वतः प्रयत्नशील होणें अशक्य आहे आणि एकदां का ती स्वतः प्रयत्नशील झाली म्हणजे तिच्यांत किंचिन्मात्र असलेल्या शक्तीची प्रचंड वाढ होण्याला कितीसा उशीर लागणार आहे? अखेरीस मथुरा आपल्या ठिकाणीं पुरती शक्तिमान झालेली दिसून येतांच कंस ताबडतोब तिला आपल्या दास्यांतून मुक्त करील; नव्हे, मथुरेला स्वतंत्र करणें कंसाला भाग पडेल! मग दुसरा कुणीही तिची ती प्रचंड शक्ति पाहून डोळा वर करून तिच्याकडे पाहण्यास धजणार नाहीं. दुर्बलांनीं स्वतः प्रयत्नशील होऊन आपल्या प्रयत्नांच्या तेजस्वी शक्तीचा ध्वजा जगाच्या डोक्यावर निर्भयपणें नाचविल्याशिवाय जगांत त्यांना कुणीही विचारीत नसतो. म्हणून बलवानांनीं अशा दुर्बलांना साह्य न करणें हेंच दुर्बलांच्या हिताचें आहे. दुर्बलांची दुर्बलपणाची भावना त्यावांचून नष्ट होत नसून उत्कर्ष त्यांच्याकडे नुसता ढुंकूनही पहात नाहीं! जगांतली सगळी वैभवलक्ष्मी बलवंतांच्याच पायाशीं आपोआप लोळण घेते आणि तीच चिरकाल टिकते.

**श्रीकृष्ण**—परक्या शक्तीची याचना करणें किंवा शक्तिमानांनीं दुर्बलांना पाठीशीं घालणें हें राधेच्या विचाराप्रमाणें कदाचित् अन्यायाचें होत असेल. पण आपली स्वतःचीच दूर असलेली अमोघ शक्ति ऐन कठीण प्रसंगीं साह्यास बोलावणें हेंही तितकेंच गैर होईल काय?

**राधा**—नाहीं, तें अनुचित होणार नाहीं. संकटग्रस्ताला त्याच्या ऐन संकटाच्या वेळीं जर त्याची स्वतःची शक्ति भ्याडपणानें हातपाय गाळून शहाणपणाच्या पांघरुणाखालीं जर स्वस्थ बसली किंवा त्याच्या हांकेस वेळेवर ओ दिली

नाहीं, तर त्या शक्तीचा तो नामर्दपणा दिसून येईल. एवढेंच नाहीं, तर त्या शक्तीनें कृतघ्नपणाही केल्यासारखें होईल. आणि तो संकटग्रस्त माणूस त्या शक्तीच्या अभावीं जर का त्या संकटांत भस्मसात् झाला तर त्याचें पाप त्या शक्तीच्याच डोक्यावर फुटून त्या माणसाचा त्याच्या स्वतःच्या शक्तीनेंच पुरा पुरा विश्वासघात केला असें बिनदिक्कत ह्मणतां येईल.

**श्रीकृष्ण**—मग सांग राधे, वसुदेवानें स्वाधीन केलेली व राधेनें जोपासलेली ही मथुरेची श्रीकृष्णशक्ति जर त्या मथुरेनें आपल्या ऐन संकटाच्या काळीं बोलावली किंवा तिला साह्य करण्यास ती धांवून गेली तर काय दोष ? उलट, गेली नाहीं तर त्या बिचाऱ्या मथुरेचा विश्वासघात केल्याप्रमाणें होणार नाहीं काय ? राधे, अशी संशयांत पडूं नकोस किंवा आश्चर्यांत बुडूनही जाऊं नकोस. ही गोष्ट आजपर्यंत अज्ञात होती. तुझ्या पुण्याईनें ती आज जगाला कळत आहे. मथुरेचें हें शक्तिबीज निर्माण झाल्यावर कंसाच्या प्रखरपणामुळें अवेळींच करपून जाऊं नये ह्मणून तिची योग्य प्रकारें वाढ होण्याला राधेच्या प्रेमळपणाच्या छत्राखालीं वसुदेवानें तें हळूंच आणून सोडलें. तेव्हां राधेची श्रीकृष्ण ही संपत्ति असली तरी मथुरेची शक्ति होय. ह्मणून मथुरेच्या अशा विपत्कालीं तिनें विश्वासानें तुझ्याजवळ ठेवलेली आपली शक्तीची ठेव तितक्याच प्रेमानें तिच्या स्वाधीन करणे हे राधे, तुलाही उचित आहे.

**राधा**—मग श्रीकृष्ण राधेचा कीं राधा श्रीकृष्णाची ? आणि शेवटीं राधाकृष्ण हे दोघेही कुणाचे ? ज्या जगताच्या रंगभूमीवर हे दोघे अवतीर्ण झाले त्याच्याशिवाय दुसऱ्या कुणाचे असूं शकणार ! अर्थात् त्या जगताच्या हिताकरितां झटणें हें दोघांचेंही कर्तव्यच ठरतें.–पण मग या राधेनें उच्चारलेल्या प्रतिज्ञेचें काय ? ती प्रतिज्ञा स्वार्थी खरी. पण उपयोग काय ? तोंडांतून निघून गेली. आतां वचनभंगाचा दोष माथीं येईल.—चिंता नाहीं. राधेवर येणाऱ्या दोषारोपापेक्षां श्रीकृष्णाचे जाण्यांत जगत्कल्याण आहे. तर वचनभंगाचा दोष आपखुशीनें पत्करून, त्यांत राधेची जगामध्यें छीथू झाली तरी हरकत नाहीं, पण श्रीकृष्णाला मथुरेला जाऊं देणेंच इष्ट दिसतें.

[ अक्रूर प्रवेश करितो. ]

**अक्रूर**—माते राधे, हा अक्रूर तुला शरण आला आहे.


**राधा**--शरणागताचें स्वागत असो ! अक्रूरा, वसुदेवानें स्वाधीन केलेली, व राधेनें जोपासलेली ही मथुरेची श्रीकृष्णशक्ति आज तुझ्या मी स्वाधीन करीत आहें. ( श्रीकृष्णाचा हात अक्रूराच्या हातीं देते. ) अक्रूरा, आतां श्रीकृष्ण राधेचा नाहीं, श्रीकृष्ण जगताचा आहे !

[ अक्रूर राधेला नमस्कार करतो. ]

( पडदा पडतो. )

---

## अंक दुसरा समाप्त



# अंक तिसरा.

## प्रवेश १ ला.

[ मथुरेचे कांहीं नागरिक प्रवेश करितात. ]

**एक नागरिक**—ती पहा मिरवणूक येते आहे.

**दुसरा नागरिक**—श्रीकृष्ण तोच नाहीं का ?

**तिसरा नागरिक**—अक्रूराच्या पुढचा ?

**एक नागरिक**—काय पण तेजस्वी दिसतो ! खरा दैवी अंश वाटतो बुवा आपणाला !

**तिसरा नागरिक**—मला तर ईश्वराचा अवतारच वाटतो ! तेव्हां तर एवढाले मोठे अद्भुत पराक्रम श्रीकृष्णांकडून झाले आणि तेही या लहान वयांत. अघासुरास ठार मारणें सामान्य मनुष्याचें काम नव्हे. हो-ती पहा मिरवणूक जवळ आली !

**दुसरा नागरिक**—श्रीकृष्ण कसा अगदीं राजबिंडा दिसतो ! इतकीं माणसें आहेत पण त्यांत हा सूर्यासारखा तळपून चटकन नजरेंत भरतो ! त्या सर्वांवर श्रीकृष्णाचेंच तेज पसरलेलें दिसतें. माझी दृष्टि तर श्रीकृष्णाच्या मुखावरून हले-नाशीच झाली आहे !

**पहिला नागरिक**--कंसाचीं आतां शंभर वर्षे भरलीं ह्मणायचीं ! काय पण मथुरेला आणि आपणांला त्रास दिलान् ! आज मथुरेची कोण अवस्था आहे ! या कंसानें बिचारीला त्राहि भगवन् करून सोडलें आहे ! तिच्या सुटकेकरितां लोकांनीं थोडे का कष्ट घेतले ! पण ज्याचें नांव तें ! या कंसानें मुळींसुद्धां कोणाचें चालूं दिलें नाहीं. दुष्ट तो दुष्टच हो !

**तिसरा नागरिक**—श्रीकृष्ण सांगेल त्याप्रमाणें वाटेल तें करायची आतां आमची पूर्ण तयारी झाली आहे. श्रीकृष्णाच्या ह्मणण्यावर वेळीं प्राण सुद्धां आम्ही देऊं, पण मथुरेला स्वतंत्र करूंच करूं. प्राणावर उदार झाल्याशिवाय कंसाच्या बलाढ्य शक्तीचा नक्षा उतरणार नाहीं. आणि आम्हीं आपले प्राण मथुरेवरून केव्हांच ओवाळून टाकले आहेत !

**पहिला नागरिक**—नाहींतर गुलामगिरींतल्या अशा दुर्धर हालअपेष्टा भोगण्यापेक्षां मरून गेलेलें काय वाईट ? सहन तरी कोठपर्यंत करायचें ? त्याला मर्यादा असतेच कीं नाहीं ? किती जाच सोसायचा ?

**दुसरा नागरिक**—तें कांहीं नाहीं. एक घाव आणि दोन तुकडे ! जें होईल तें होईल. नाकापर्यंत पाणी आल्यावर दम तरी किती वेळ धरायचा ? आमच्या सहनशीलतेचा कंसानें पाहिजे तसा आजवर फायदा घेतला आहे. कंसाशीं आपण असे मऊपणानें वागलों, ह्मणूनच तो असा डोक्यावर बसून जड झाला !

**तिसरा नागरिक**—होऊं दे. आपणच कंसाला डोक्यावर बसविलाना ? मग तेथून त्याला फेंकून द्यायलाच असा किती वेळ लागणार आहे ?

**पहिला नागरिक**—आजवर आपणच कोठें एक होतों ? आपल्या आपआपसांत भांडणें लावूनच त्यानें आपला कार्यभाग साधून घेतला. आणि आपणही मूर्खासारखे त्याच्या नादीं लागून आंधळेपणानें भांडतच होतों. शेवटीं दोघांनाही लभ्यांश काय, तर नरवटी ! वेळींच सावध झालों ह्मणून बरें झालें. वाघाचे खरे दांत दिसून आले.

**दुसरा नागरिक**—याला कारण आपणच भोळसट माणसें ! तुह्मां भोळ्या आणि लवचिक मनाच्या माणसांना बगलेंत मारूनच वसुदेव-अक्रूरांना कंसानें इतकें निष्ठुरपणानें छळलें ! नाहींतर कंसाची काय छाती होती त्यांच्या वाटेस जाण्याची !

**पहिला नागरिक**—पण आम्हीं गाढव ठरलोंना ? आतां काय त्याचें ? यापुढें काय करायचें त्याला तयार व्हा !

**दुसरा नागरिक**—आम्ही केव्हांच तयार होतों ! तुम्हीच आमचे पाय मागें ओढीत होतां. आणि त्याचेंच पाप मथुरा सध्यां भोगीत आहे.

**तिसरा नागरिक**—आतां एकच गोष्ट. कंसच जिवंत राहील किंवा आम्हीच जिवंत राहूं ! कंस जिवंत राहिल्यास आमच्या सर्वांचीं मेलेलीं प्रेतेंच त्याच्या नजरेस आलीं पाहिजेत. आणि आम्ही जिवंत असल्यास मथुरा तरी स्वतंत्र झाली पाहिजे ! पण अशीं जिवंत प्रेतें होऊन राहण्याचा अगदीं आपल्याला वीट आला आहे.

*

**दुसरा नागरिक**—आलीच मिरवणूक—ती पहा—बोला—श्रीकृष्णाचा जयजयकार असो !

[ श्रीकृष्णाचा जयजयकार असो या जयजयकारांत अक्रूरासह श्रीकृष्ण प्रवेश करितो. मथुरेंतील स्त्रिया श्रीकृष्णावर फुलें उधळून त्याला मंगल आरतीनें ओंवाळतात. ]

---

## प्रवेश २ रा.

[ **कंस** आणि **अक्रूर** ]

**अक्रूर**—राजा, श्रीकृष्णाचा अपमान करूं नकोस. त्याचा भलताच परिणाम होईल. मथुरेच्या लोकांचें श्रीकृष्णावर अत्यंत प्रेम आणि भक्ति आहे. राजा, श्रीकृष्णाचें प्रेमानें स्वागत करून त्याशीं तूं सख्य कर. त्यांतच तुझें कल्याण आहे.

**कंस**—माझ्या शत्रूशीं सख्य करूं म्हणतोस ? माझ्या अघासुरादि मित्रांचा निर्दयपणानें वध करून या बलाढ्य कंसाला शक्तिहीन करण्याचा ज्यानें प्रयत्न केला त्याचें प्रेमानें स्वागत करूं म्हणतोस ? माझी प्रजा माझ्यावरच उलटवून या कंसाला निःसत्व करून टाकण्याचा ज्याचा ठाम निश्चय, त्याच्याशीं स्नेह धरूं म्हणतोस ? एवढा मी राजासारखा राजा असतांना माझ्या तरुण प्रजेला या कंसासमोर कंसाचाच धिक्कार करवून आपल्या स्वतःच्या जयजयकारानें या कंसराजाला राजेपणापासूनच उठाविण्याची ज्याची सदोदित शिकवण, त्यालाच आनंदानें कडकडून भेटूं म्हणतोस ? अक्रूरा, यासाठीं तुला मीं बोलावलें नाहीं. तर आपल्यावरोबर आणलास तसा त्याला मथुरेच्या बाहेर घालवून दे, ही तुला माझी आज्ञा आहे.

**अक्रूर**—राजा, श्रीकृष्णाला मथुरेंत आणणें तेवढें माझें काम होतें. आतां त्याला मथुरेंतून परत नेणें तुला वाटतें तितकें सोपें नाहीं. श्रीकृष्ण आतां मथुरेचा प्राण झाला आहे. राजा, ज्या ठिकाणीं लोकांचें अत्यंत प्रेम आणि भक्ति एकवटलेली असते, त्या ठिकाणीं जगतांतील सर्व बलाढ्य शक्ति कशा हतबल आणि नामोहरण होतात, हें आतां तरी ध्यानांत आणून श्रीकृष्णाचा तूं मानभंग करूं नकोस. हें तुला मी पुनः पुन्हां बजावून सांगतों. राजा, तुझी कल्पना झाली आहे तितका कठोर अंतःकरणाचा श्रीकृष्ण खास नाहीं. श्रीकृष्णासारखा उदार

आणि प्रेमळ मनाचा उभ्या दुनियेंत दुसरा कोणी तुला सांपडावयाचा नाहीं ! खरें पाहूं जातां कंसराजानें श्रीकृष्णाशीं वैर करूं नये !

**कंस**—आपल्या हाडवैऱ्याला शत्रु मानूं नये, तर काय त्याला कंठीं धारण करावें ? म्हणजे आयतेंच आपण होऊन आपली मान शत्रूच्या स्वाधीन करून त्याचा मोठेपणा कबूल करणेंच झालें ! सांग या कंसासारखा शूर आणि बलाढ्य राजा दुसरा कोण आहे ? जरासंधासारखे रथीमहारथी वीर ज्या कंसाचा स्नेह संपादून त्याच्या मर्जीविरुद्ध कोणतीही गोष्ट न करण्याला मनापासून झटत असतात, त्या कंसानें ज्याला आजन्म आपला शत्रु म्हणून मानला, त्याला श्रेष्ठ समजून डोक्यावर घेऊन नाचावें होय ? पूर्वेचा सूर्य पश्चिमेस उगवेल, पण ही गोष्ट या कंसाकडून कालत्रयीं घडणार नाहीं !

**अक्रूर**—राजा, आपल्या स्वभावाचा हा हट्टवादीपणा जरा बाजूला ठेवून 'श्रीकृष्ण आहे कोण' असें आपल्या मनाला तूं विचार. तुझें मन तुला श्रीकृष्ण मित्रच आहे असें सांगेल ही माझी खात्री आहे. राजा, कृष्णप्रेमानें तूं इतका अंतर्बाह्य रंगला आहेस कीं, तुझ्यासारखा महाभाग्यवान पुरुष साऱ्या जगांत मला कोणी दिसत नाहीं. मोठे मोठे कृष्णभक्त देखील तुझ्यापुढें फिके पडतील ! म्हणून तुला पुन्हां सांगतों कीं श्रीकृष्ण दरबारांत आल्यावर त्याचा अनादर करूं नकोस. त्याला शरण जाऊन त्याच्याशीं सख्यच जोड आणि आपल्या स्वतःचें आणि मथुरेचें दोघांचेंही कल्याण करून घे.

**कंस**—मी जो त्याच्याकरितां वेडा झालों आहे तो त्याच्या गाढ प्रेमानें नव्हे तर त्यानें केलेल्या माझ्या अक्षम्य अपराधाबद्दल त्याचा मी सूड केव्हां घेईन यासाठीं होय. त्याला दरबारांत येऊं दे म्हणजे शरण जाण्याऐवजीं या कंसाकडून त्याला मरण किती लवकर मिळतें तें तूंच आपल्या डोळ्यांनीं पाहशील !

**अक्रूर**—ही गोष्ट खोटी आहे. राजा, ह्या तुझ्या वल्गना श्रीकृष्णाला तूं पाहिलें नाहींस तोंपर्यंतच. दरबारांत येऊन श्रीकृष्णाची आणि तुझी एकदां दृष्टादृष्ट होऊं दे, म्हणजे तुझा सगळा हा आवेश, संताप पार कोठच्या कोठें विरून जाऊन एखाद्या मंत्रमुग्धाप्रमाणें त्याच्या तेजस्वी मुखाकडे एकतार दृष्टीनें तूं पाहत राहशील. दगडी पुतळ्यासारखा निश्चल राहून कांहीं केल्या तुझी दृष्टि तेथून हलणार नाहीं. तो पहा, मथुरेंतील लोकांसह श्रीकृष्ण दरबारला येत आहे.

[ पडदा वर जातो. दरबारचा देखावा. श्रीकृष्ण मथुरेंतील लोकांसह प्रवेश करितो. सभा तटस्थ होते. ]

**श्रीकृष्ण**—मथुरेच्या या राजसिंहासनाला हा श्रीकृष्ण अभिवादन करीत आहे.

[ कंस त्याच्या मुखाकडे टक लावून पहातच राहतो. ]

**श्रीकृष्ण**—कंसा, मथुरेला तावडतोब स्वतंत्र करून मथुरेच्या इच्छेप्रमाणें यापुढें आपला राज्यकारभार चालवावा अशी मथुरेच्या लोकांची तुझ्याजवळ मागणी आहे.

**कंस**—पण ही मागणी करणारा तूं कोण ? तुला मी ओळखीत नाहीं !

**श्रीकृष्ण**—ज्याचा तुला सारखा निदिध्यास लागला आहे आणि मथुरेच्या लोकांनीं ज्याला आपला नायक मोठ्या प्रेमानें आणि आनंदानें निवडलें आहे, तो हा श्रीकृष्ण, तुझ्या जाचांतून मथुरेला मुक्त करण्याची आणि तिच्याच मनाप्रमाणें राज्यचक्र फिरविण्याची कंसा, तुला विनंती करीत आहे.

**कंस**—वाटेल त्या वाटेवरच्या चोरानें उठावें आणि नायक म्हणून मिरवावें, आणि त्याला लोकांची संमति आहे म्हणून खुशाल सांगत सुटावें ! आजच्या घडीला अनुयायांपेक्षां नायकांचाच सुळसुळाट झालेला पाहण्यांत येतो. तो भामटा वसुदेव नायकच, हा चोर अक्रूर नायकच, आणि तूं विश्वासघातकी दरोडेखोर नायकच—अबबब, काय ही नुसत्या नायकांची कंठाळ ! कोणाला वाटेल मथुरेची आणि लोकांची ह्यांना केवढी काळजी !

**मथुरेचे लोक** - राजा, मथुरेला आणि आह्मां प्रजेला तुझा जुलूम आतां सर्वतोपरी असह्य झाला आहे. राजा, साधुसंतांचीं यज्ञादि कर्मे नीट रीतीनें पार पडूं देत नाहींस, त्यांची वाटेल तशी विटंबना करून त्यांच्या गाईंना जबरदस्तीने धरून आणून निर्दयपणानें त्यांचा वध करतोस; लहान लहान अर्भकांचा खून केलास; तरुण तरुण मुलामाणसांना विनाकारण अंधारकोठडी आणि हद्दपारीसारख्या भयंकर शिक्षा दिल्यास; मन मानेल तसा कर वाढवून आह्मां प्रजेला अगदीं पिळून काढलेंस; प्रत्यक्ष तूं आपल्या पित्याला—उग्रसेनमहाराजांना कैदेंत टाकून त्यांचे करूं नये ते हाल केलेस; आह्मांला प्रिय असणाऱ्यांचा खुनशीपणानें दुष्टावा करून त्याविषयीं त्यांना आणि आह्मांला दोघांनाही नाना प्रकारांनीं गांजलेंस; तुझ्यामुळें पतिव्रता स्त्रियांना आपलें पातिव्रत्य रक्षण करणें दुष्कर

होऊन गेलें आहे! असे एक कीं दोन, तुझ्या जुलमी आणि अन्यायी वर्तनाचे पाढे तरी किती वाचावे? त्यामुळें मेघराजाची अवकृपा होऊन दुष्काळांवर दुष्काळ पडून सर्व देश कसा अगदीं रंजीस आला आहे! कित्येक वेळां, राजा बरा पण निर्दय खाटिकालाही लाजविणारे हे राजाचे हस्तक नकोत, असें म्हणण्याची प्रजेवर पाळी येते! राजा, यायोगानें आम्ही अगदीं त्रस्त होऊन आमचा जीव सुद्धां आम्हांला नकोसा झाला आहे! या तुझ्या वर्तनाला कांहीं तरी आळा पडावा म्हणून आजपर्यंत पुष्कळ प्रकारांनीं तुझ्या विनवण्या केल्या. पण त्या सर्वांना तूं लाथाडलेंस. आतां यापुढें तुझी जुलमी, अन्यायी आणि कठोर अधिकारी-सत्ता आम्हां मथुरेच्या प्रजेला सहन होणें अगदीं दुरापास्त आहे! सर्व बाजूंनीं हताश आणि निराधार झाल्यावरच अगदां निर्वाणीचें अस्त्र म्हणून शेवटीं श्रीकृष्णाला आमची दाद लावण्याकरितां तुझ्याकडे आम्हीं पाठविलें आहे. तो जें करील तें आम्हांस सर्वथैव मान्य आहे आणि त्यामुळें जे जे परिणाम घडून येतील ते ते सारे भोगायला आमची पूर्ण तयारी आहे. तेव्हां राजा, आमच्या श्रीकृष्णाची, ह्या आमच्या प्रिय नेत्याची या भरदरबारांत अशी हेटाळणी करून तूं असा अपमान करूं नकोस! श्रीकृष्णाचा कोणत्याही तऱ्हेचा मानभंग होणें म्हणजे तुझ्या मथुरेच्या प्रजेचाच अपमान होय हें लक्षांत आण. आणि राजा, तुझ्या उन्मत्त-पणामुळें या दरबारांत कांहीं बरावाईट प्रकार घडून आसल्यास त्याची सर्व जबाबदारी सर्वस्वी तुझ्यावर आहे, आमच्यावर नाहीं, हेंही ध्यानांत धर!

**कंस**—अशा या दुरदुरीला कोणी भिऊन जावें? या दुरदुरीला बंद पाड-ण्याची ज्याच्या मनगटांत ताकद नसेल त्यांनीं! अशा नेभळट बडबडीला जर आजपर्यंत भीक घातली असती तर या कंसाचे केव्हांच तीन तेरा झाले असते! अहो राजेश्री, तुम्हां प्रजेला आणि तुमच्या या उपटसुंभाला या दरबारांत आज पुन्हां असें ठासून बजावतों कीं, मथुरा ही माझी दासी असून तुम्ही मथुरेचे प्रजाजन माझे गुलाम आहांत! आणि त्यांना पाहिजे तसें वागविण्याचा या कंस-राजाला हक्क आहे!

**श्रीकृष्ण**—कंसा, राजेपणाची तुझी ही कल्पना असल्यास ती ताबडतोब टाकून दे. हा निव्वळ तुला भ्रम झाला आहे. प्रजा ही राजाची गुलाम नसून खरा धनी होय. आणि राजा म्हणजे प्रजेचा एकनिष्ठ सेवक आहे

ऐन मध्यान्ह रात्रीं प्रजाजन झोपेंत अगदीं गर्क असतां त्यांच्या संरक्षणार्थ राजाला जागत गस्त घालावी लागते हें लक्षांत आण. म्हणजे धनी कोण आणि गुलाम कोण याचा खरा खरा तुला उलगडा होईल. प्रजेच्या संतोषावरच राजांचीं सिंहासनें स्थापिलीं जातात. त्या प्रजेचा राजेलोकांनीं आपल्या मदांध-पणानें असा धिक्कार करणें म्हणजे कृतघ्नपणाचा कळसच होय ! म्हणून म्हणतों कंसा, मथुरेला स्वतंत्र करून तिचा आनंद वर्धित कर आणि तिच्या इच्छेप्रमाणें आपला राज्यव्यवहार चालवून आपलें राजसिंहासन अभंग ठेव.

**कंस**—राजांचीं सिंहासनें भिकारड्या प्रजेच्या आनंदावर अवलंबून नसतात. तीं त्यांच्या बाहुबलावरच उभारलीं जातात. म्हणून प्रजेनेंच उलट राजाला नमून वागलें पाहिजे. राजाच्या मर्जीबाहेर जाणें हें प्रजेचें कर्तव्यच नव्हे. मग प्रजेच्या फाजीलपणाविषयीं राजांनीं त्यांची कानउघाडणी केली तर प्रजेला त्याचें एवढें वाईट कां वाटावें ? मथुरा आणि मथुरेचे लोक यांनीं माझ्या विचाराप्रमाणें कां चालूं नये ! माझ्याविरुद्ध गेले म्हणूनच त्यांना या कंसाचा छळवाद सोसावा लागत आहे. राजांनीं आपल्या सत्तेची जरब प्रजेवर जर यथास्थित बसविली नाहीं तर राजाचा दरारा प्रजेवर राहील कसा ? आणि मान तरी प्रजेकडून कसा मिळेल ? प्रजा म्हणजे परसांतली भाजी समजून जो राजा वागेल त्याचीच प्रजा. त्याचाच राजेपणा जगावर अबाधित चालेल. प्रजा राजाच्या दारचें कुत्रें होय. अर्थातच आपली सत्ता वाढविण्याकरितां आपल्या इच्छेप्रमाणें प्रजेला वागविणें हाच राजाचा राजधर्म होय !

**श्रीकृष्ण**—ज्या ठिकाणीं राजा म्हणजे मालक आणि प्रजा म्हणजे गुलाम हा धर्म समजला जातो तीं सिंहासनें फार दिवस पृथ्वीवर टिकत नाहींत. कंसा, राजा हा प्रत्यक्ष विष्णूचाच अंश असून प्रजेचा मुख्य नेता होय. प्रजेच्या सुख-दुःखाकडे राजापरता दुसरा कोण पाहणारा आहे ? राजानेंच आपल्या प्रजेला झिडकारलें तर त्या प्रजेचे जगांत कुत्रा देखील हाल खात नाहीं. अर्थात् या कारणपरंपरेमुळें आपल्या राजावर प्रजेची अढळ निष्ठा असणें जरी जरूर असलें तथापि मूलभूत आणि नैसर्गिक राज्यपद्धति लोकसत्तेवरच उभारली पाहिजे. आणखी त्याकरितां कोणताही त्याग करणें जरी भाग पडलें तरी तो राजानें निःसंशय केला पाहिजे. कंसा, तुला ज्या शक्तीची घमेंड आहे ती शक्ति

प्रजेपासूनच तुझ्या ठिकाणीं उत्पन्न झाली आहे. प्रजेचा पाठिंबा नसलेला कोण-ताही राजा स्वतःच्याच शक्तीवर पुष्कळ वेळ जगांत नांदूं शकत नाहीं. प्रजेला संतुष्ट ठेवूनच राजानें आपली शक्ति वाढविली पाहिजे. कंसा, तूं समजतोस तितक्या कमी योग्यतेची तुझी प्रजा खास नाहीं. प्रजेंत एकवटून असलेली शक्ति मोठी सामर्थ्यवान असते. ती जिकडे वळेल तिकडे आपली फत्ते केल्या-शिवाय रहात नाहीं. प्रजेंत असलेली गुप्त शक्ति म्हणजे राखेंतला निखारा होय. तेव्हां त्या शक्तीचा असा पावलोंपावलीं उपमर्द करून गर्वांधपणानें तिच्यावर तिरस्काराचा फुंकर घालूं नकोस. नाहींतर फुंकर घालून भडकलेल्या त्या शक्तीच्या ज्वाळा कंसा, केव्हांच तुला भस्मसात् करून टाकतील ! म्हणून म्हणतों, तुला जर प्रजेचा संतोष कायम ठेवून आपलें राजेपण चिरस्थायी करायचें असेल तर मथुरेला स्वतंत्र करणें कंसा, तुला भागच आहे !

**कंस**--नाहीं, मथुरेला स्वतंत्र करीत नाहीं ! आणि आतां तर मुद्दामच तिला स्वतंत्र करणार नाहीं ! कोणती खुळचट शक्ति मथुरेला स्वतंत्र करण्यास या कंसाला भाग पाडते, तेंच आतां पहायचें आहे !

**श्रीकृष्ण**--कंसा, जी प्रजाशक्ति राजाला वैभवाच्या उच्च शिखरावर चढ-विते, तीच प्रजाशक्ति इच्छेस वाटल्यास त्याला धुळीसही मिळवूं शकते. तर कंसा, राजमदानें धुंद झालेली दृष्टि साफ करून माझ्या म्हणण्याचा नीट विचार कर. भलत्याच अविचाराच्या भरीस तूं पडूं नकोस. तूं आणि तुझें सिंहासन अढळ रहावें अशी माझी मनापासून इच्छा आहे. कंसा, तुझ्याशीं आम्ही विरोध करीत नसून तूं ज्या असुरी वृत्तीचा अंगीकार केला आहेस त्या वृत्तीचे आम्ही द्वेषी आहोंत. द्वेषाची कल्पना तुझ्या प्रजेच्या ठिकाणीं मुळींच नाहीं. इतकेंच नव्हे तर तिला द्वेषभावना कधीं शिवत सुद्धां नाहीं म्हटलें तरी चालेल. कंसा, राजाशिवाय प्रजेचें चालत नाहीं. आज तूं नाहीं तुझ्या बदली दुसरा कोणी तरी लोकमतानुवर्ती नेता नियंत्रणासाठीं सिंहासनावर बसविल्यावांचून प्रजेस गत्यंतर नाहीं. प्रजा ही केव्हांही राजाचीच आहे. प्रजेंतला प्रत्येक माणूस कांहीं राजा होऊं शकत नाहीं. यासाठीं तुझ्याच कृष्णकृत्यामुळें असंतुष्ट झालेल्या प्रजे-वर चिडून जाऊन त्या संतापाच्या भरांत गरीब बिचाऱ्या प्रजेचीं हाडें नरम करण्यापेक्षां तिच्याशीं एकरूप कां होऊन जात नाहींस ? प्रजेचा असंतोष राजाचा

कोणाचाही उत्कर्ष होऊं देत नाहीं. राजाला, प्रजेमध्यें धुमसत असलेला असंतोष जितका हानिकारक आहे तितकें दुसरें जगांत कोणतेंही वाईट नाहीं. प्रजेच्या असंतोषानें राज्याची इमारत ढांसळते ( दरबारचा एक भाग कोसळतो. ) सिंहासन दुभंग होतें ( सिंहासन दुभंगतें. ) आणि राजमुगुटाच्या चिंधड्या होतात! ( कंसाच्या डोक्यांतून मुगुट आपोआप खालीं पडतो. ) कंसा, हीं दुश्चिन्हें पहा! तीं खरोखर राजनाशक आहेत! प्रजेच्या अनिवार क्षोभाचा हा अस्फुट क्षोभ आहे. आतां तरी दुराग्रह सोडून नीट शुद्धीवर ये. मथुरेला स्वतंत्र करून तिच्या इच्छेप्रमाणें चाल. आणि यायोगानें मथुरेचा आनंद संतोषानें संपादन करून त्रैलोक्यांत तूं अजरामर हो! एवढें पुनःपुन्हां तुला माझें सांगणें आहे. मी प्रजेतर्फेचा ह्मणून तुला ही बदसल्ला देत आहे अशी कल्पना तूं मनांत आणूं नकोस. तुझ्या प्रजेचा जितका मी कैवारी आहें तितकाच तुझाही आहें. कंसा, माझें ऐक. नाहींतर हीं दुःश्चिन्हें या ठिकाणीं आज तुझा बळी घेतल्याशिवाय खास राहणार नाहींत!

**कंस**—कोसळूं दे, सारें ब्रह्मांड या कंसावर कोसळूं दे! हा कंस एक केसभर देखील आपल्या जागेवरून हलणार नाहीं! अस्सा येथें निश्चळ उभा राहील! या विश्वांतल्या पंचमहाभूतांची गठडी वळवून जमीनींत त्यांना गाडून टाकण्याचें सामर्थ्य एकट्या या कंसांत आहे! सगळें ब्रम्हांड जरी या कंसराजावर उलटलें तरी त्याची मला मुळींच पर्वा नाहीं! विश्वांतील सर्व शक्ति जरी या कंसाच्या विरुद्ध गेल्या तरी सुद्धां त्यांची यत्किंचितही मला दिक्कत वाटत नाहीं! त्या सर्वांना अस्सें लाथेखालीं चिरडून टाकीन! या कंसाला नुसतें भिवविण्याला या ब्रह्मांडगोलांत आज कोण समर्थ आहे? ब्रम्हांडांतल्या साऱ्या जीवजंतूंनीं या कंसाचा हुकूम मानला पाहिजे! त्याच्या इच्छेप्रमाणेंच त्यांना आपल्या माना डोलविणें भाग आहे!

**श्रीकृष्ण**—पण यदृच्छेनें फिरत असलेल्या विश्वचक्राची गति थांबविण्याला त्रैलोक्यांत कोणाही शक्तिमान नाहीं! तें चक्र आपल्या गतीचा जसा धक्का देईल तसें हें विश्व हाललें पाहिजे. त्याच्यापुढें निमुटपणें मान वांकविणें प्राणिमात्रास भाग आहे. ब्रम्हांडांतील अतर्क्य आणि अगम्य अशा साऱ्या घडामोडी प्रत्यहीं त्याच्याच इच्छेनुसार आपोआप घडून येतात. विरुद्ध गतीनें जाण्यासाठीं कंबर

कसून तयार झालेले मोठमोठे मी मी म्हणणारे सुद्धां त्या गतिसामर्थ्यापुढें हतबल झाले आहेत. मग यःकश्चित् कंसा, तुझी कथा काय! त्या विश्वचक्रासमोर चीत होण्यास तुला एक क्षणार्धही पुरता लागणार नाहीं. कंसा, तुझी तशी इच्छा नसली तरी त्या चक्राच्या गतीप्रमाणें तुला चाललेंच पाहिजे, नव्हे तूं चालशीलच!

**कंस**—माझी इच्छा मथुरेला स्वतंत्र करण्याची नाहीं. कोण मायेचा पूत तिला स्वतंत्र करण्याला पुढें येतो तो येऊं दे! कोणचें चक्र आपल्या गतीप्रमाणें या कंसास फिरवितें तें पाहूं दे! (प्रधानास) जा, त्या बदमाष वसुदेवाच्या पायांत पुन्हां पहिल्यासारखे लोखंडी साखळदंड अडकवून आत्तांच्या आतां त्याचा शिरच्छेद करा! आणि माझ्या आज्ञेशिवाय त्या भिकारड्या मथुरेला अन्नाचा एक कण आणि पाण्याचा थेंबही देऊं नका!

[ प्रधान जातो. शिपाई प्रवेश करितो. ]

**शिपाई**—मथुराधिपतीचा जयजयकार असो! महाराज तुरुंगावरील अधिकारी व शिपाई यांपैकीं कोणीच महाराजांचा हुकूम मानीत नसून फौजेंतले सारे शिपाई नोकरी सोडून आपापल्या घरीं चालते झाले आहेत!

**कंस**—काय, सैन्यांत फितुरी? या फितुरीला हा काळतोंड्याच कारण आहे. यालाच आधीं ठार केलें पाहिजे.

( असें म्हणून श्रीकृष्णाच्या अंगावर कंस धावून जातो. श्रीकृष्ण त्याची शेंडी धरतो. )

**श्रीकृष्ण**—कंसा, तुझ्याकडे मी वकील या नात्यानें आलों असतां तूं जाणून बुजून विश्वासघातानें विनाकारण मला ठार मारण्यास प्रवृत्त झालास हा अधर्म असून तुझ्या आसुरी वृत्तीचा कळस झाला. तुझ्या पापाचा घडा आतां संपूर्ण भरला गेला. तेव्हां मथुरेच्या सुटकेकरितां तुला ठार मारल्याशिवाय मला गत्यंतर नाहीं!

[ दोघांची झोंबाझोंबी होते. तींत कंसाला श्रीकृष्ण खालीं पाडून त्याच्या छातीवर बसतो. कंस उठण्यासाठीं धडपड करतो. ]

**श्रीकृष्ण**—कंसा, ही उठण्याची धडपड आतां तुझी व्यर्थ आहे! ही सर्व विश्वाची शक्ति तुझ्या छातीवर बसली आहे. तुझ्या ठिकाणीं असलेली सारी मर्दुमकी या विश्वशक्तीसमोर या वेळीं कुचकामी झाली आहे. बोल, मथुरेला

स्वतंत्र करून तिच्या मर्जीप्रमाणें चालण्याची तुझी इच्छा असल्यास अजूनही तुला मी जीवदान देतों !

**कंस**—या कंसाच्या जीवांत जीव आहे तोंपर्यंत मथुरेला स्वतंत्र करण्याचें नांव काढूं नकोस.—आतां अगोदर तुझा प्राण घेतों !

( पुन्हां उठण्यासाठीं धडपडतो. )

**श्रीकृष्ण**—मथुरेच्या स्वातंत्र्याकरितां कंसवध होणें आतां जरूर आहे ! अन्यायी आणि जुलमी राजांची राजेपणाची कल्पना चुकते, ह्मणून प्रजाक्षोभाला त्यांचा असा बळी पडतो. कंसा, आपण होऊन दुष्टपणानें तूं आपला मृत्यु आपणावर ओढून घेतलास ! न्यायनीति जगावर प्रस्थापित होण्याकरितां राजाला साह्य करणें जसें प्रजेचें कर्तव्य ठरतें, उपकार होत नाहीं तसेंच अन्यायाचा आणि गुलामगिरीचा नायनाट करण्याकरितां जुलमी राजांचा निःपात करणें हेंही प्रजेचें कर्तव्यच होतें. पाप ठरत नाहीं. ह्मणून कंसवधाचें पातक मला लागणार नाहीं.

[ श्रीकृष्ण कंसाचा गळा दाबून प्राण घेतो.

श्रीकृष्णावर वरून पुष्पवृष्टि होते ]

[ **राधा** आणि **मथुरा** प्रवेश करितात ]

**राधा**—( श्रीकृष्णावर फुलांची ओंजळ फेंकून ) श्रीकृष्णा, तुझ्या पुढील अवतारकार्याच्या प्रारंभींचा हा तुझा विजय ह्मणजे शुभ शकुनच होय ! मथुरे, जगांतली संपत्ति आणि शक्ति सद्धेतूनें एक झाल्यावर विश्वसृष्टीचें मंगल झालेंच पाहिजे !

**अक्रूर**—माते मथुरे, आज तूं श्रीकृष्णकृपेनें स्वतंत्र झालीस. तुझ्या ऋणांतून हा अक्रूर मुक्त झाला आहे. ( नमस्कार करितो )

**मथुरा**—वत्सा अक्रूरा, मथुरेचें हें स्वातंत्र्य चिरकाल भोगण्याची परमेश्वर तुला उदंड शक्ति देवो !

[ अंधारकोठडींतून सुटलेलीं मुलें प्रवेश करितात ]

**मुलगा**—दीन अनाथांचें पालन करणाऱ्या श्रीकृष्णाचा जयजयकार असो !

**मुलगी**—सज्जनांचें रक्षण करणाऱ्या श्रीकृष्णाचा जयजयकार असो ! !

**मुलगा**—दुष्टांचा संहार करणाऱ्या श्रीकृष्णाचा जयजयकार असो ! !

( पडदा पडतो. )

# भरत-वाक्य.

भरतवाक्य तेव्हां । गाउं स्वरें देवा ॥ ध्रु० ॥

मुक्तपणें तव यश-गाना ।
मुक्तता हवी मना ।
तो क्षण ये केव्हां ? ॥ १ ॥ भरत०

बद्ध जीवनीं ये कुठुनी ।
भाव पूर्ण आननीं ?
तळमळली जिव्हा ॥ २ ॥ भरत०

पारतंत्र्य-मायेमधुनी ।
जीव भरतमेदिनी ।
मुक्त होय जेव्हां ॥ ३ ॥ भरत०

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

IRBK-0100446

IRBK-0100446

